


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३९ ■ सोमवार, दि. ९ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# भारतीय शेअर मार्केटची होरपळ सुरुच....
# सेन्सेक्स 2400हून अधिक अंकांनी कोसळला



प्रतिनिधी ९ मार्च

**मुंबई :** पश्चिम आशियातील युद्धाचे ढग गडद झाल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम उमटू लागले आहेत. याचे तीव्र पडसाद आज भारतीय शेअर बाजारात पाहायला मिळाले. बाजार उघडताच मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स Sensex १८०० अंकांनी कोसळला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या Nifty मध्येही ५२५ अंकांची मोठी घसरण झाली. सत्रादरम्यान ही घसरण अधिकच वाढली असून, सध्या सेन्सेक्स २४०० हून अधिक, तर निफ्टी ७५० हून अधिक अंकांनी खाली व्यापार करत आहे. अमेरिकन बाजारातूनही मोठ्या घसरणीचे संकेत मिळत असल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. युद्धाच्या तणावामुळे जागतिक स्तरावर इंधनाचा पुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, कच्च्या तेलाच्या किमतीत मागील आठवड्याच्या तुलनेत २० टक्क्यांची मोठी वाढ झाली असून, दर ११४ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहेत. इंधनाचे वाढते दर भारतासारख्या आयातदार देशासाठी महागाई वाढवणारे ठरण्याची शक्यता आहे.

## मोजतबा खामेनी यांची 'सर्वोच्च नेते' म्हणून निवड

दरम्यान, इराणमध्ये अयातुल्ला खामेनींचे पुत्र मोजतबा खामेनी यांची 'सर्वोच्च नेते' म्हणून निवड करण्यात आली असून त्यांच्या समर्थकांनी मोठा जल्लोष केला आहे. मात्र, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावर कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. 'अमेरिकेच्या मान्यतेशिवाय कोणताही नेता टिकू शकणार नाही,' असा पुनरुच्चार ट्रम्प यांनी केल्याने भूराजकीय तणाव अधिकच वाढला आहे.

## युद्धावर राज्यसभेत गदारोळ, विरोधकांचा सभात्याग

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सोमवारपासून सुरू झाला. विरोधक लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्यासाठी आज लोकसभेत प्रस्ताव आणणार आहेत. दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी राज्यसभेत अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धावर भाषण दिले.

परराष्ट्र मंत्र्यांनी बोलण्यास सुरुवात करताच सभागृहात गदारोळ सुरू झाला. विरोधकांनी सभात्याग केला. जयशंकर म्हणाले, 'यावेळी इराणच्या नेतृत्वाशी संपर्क साधणे कठीण आहे, परंतु भारत शांतता आणि चर्चेच्या बाजूने आहे.' काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'मध्यपूर्वेतील युद्धाचा भारतावर परिणाम, ऊर्जा संकटावर थोडक्यात चर्चा व्हावी.' दरम्यान, आज लोकसभेत अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्याच्या मागणीवरील विरोधकांच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. यावरून जोरदार गदारोळ होण्याची शक्यता आहे. काँग्रेससह विरोधी पक्षाच्या ११८ खासदारांनी १० फेब्रुवारी रोजी लोकसभा सचिवालयाला स्वाक्षरी केलेले निवेदन सादर केले होते. अध्यक्ष सभागृहाच्या कामकाजात निष्पक्षता दाखवत नाहीत आणि विरोधकांना पुरेसा संधी देत नाहीत, असा आरोप त्यांनी केला होता.

### आखातातील भारतीयांना जानेवारीतच सतर्क केले -सरकार

मुंबईच्या शिपिंग डायरेक्टरेट जनरलने १४ जानेवारी रोजी भारतीय खलाशांना सांगितले होते की त्यांनी दूतावासाच्या सल्ल्याचे पालन करावे आणि अनावश्यकपणे किनाऱ्यावर ये-जा करणे टाळावे. पश्चिम आशियातून आपल्या लोकांना परत आणण्याचे पूर्ण प्रयत्न केले जात आहेत. ८ मार्चपर्यंत आपले सुमारे ६७,००० नागरिक आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून आले आहेत. संबंधित मंत्रालये प्रतिसाद देण्यासाठी समन्वय साधत आहेत. युद्ध सतत वाढत आहे. या भागात सुरक्षा परिस्थिती खूपच बिघडली आहे. खरे तर, युद्ध इतर देशांमध्येही पसरले आहे. यामुळे विनाश आणि मृत्यू वाढत आहेत.

इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध सुरू आहे, इतकेच नव्हे तर काही आखाती देशांवरही हल्ले झाले आहेत. इराणमध्ये नेतृत्वाच्या स्तरावर अनेक लोक मारले गेले आहेत, तसेच या भागात पायाभूत सुविधाही उद्ध्वस्त झाल्या आहेत. यावेळी नेतृत्व स्तरावर इराणसोबत संपर्क साधणे स्पष्टपणे कठीण आहे. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी इराणी युद्धनौका लावनला कोची बंदरावर नांगरण्याची परवानगी दिल्याबद्दल भारताचे आभार मानले आहेत.

## आता 'लाडक्या बहिणीं'नाही मिळणार व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज !



प्रतिनिधी ९ मार्च

**मुंबई :** महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला अधिक बळ देण्यासाठी राज्य सरकारने 'लाडकी बहीण' योजनेला इतर शासकीय योजनांशी जोडण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून महिलांना विविध व्यवसाय व उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

ग्रामीण भागातील महिलांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारत नारी शक्ती संगम' या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जगातील विकसित देशांचा अभ्यास केला असता महिलांना मानवी संसाधन व्यवस्थेत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्यामुळे त्या देशांच्या विकासाला गती मिळाल्याचे दिसून येते. त्यामुळे महिलांना अधिकाधिक व्यावसायिक संधी मिळाव्यात, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. या नव्या उपक्रमाची अंमलबजावणी शासनाच्या 'उमेद' या उपक्रमामार्फत केली जाणार आहे. जिल्हानिहाय उभारण्यात येणाऱ्या 'उमेद मॉल'मध्ये महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### महिलांना मिळणारी मदतच कर्ज परतफेडीसाठी वापरणार

महिलांना केवळ 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत आर्थिक मदत देण्यापेक्षा त्या योजनेला इतर शासकीय योजनांशी जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अंतर्गत मुंबई बँकेच्या माध्यमातून महिलांना कोणताही जामीन किंवा हमी न देता विविध व्यवसाय आणि उपक्रमांसाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. विशेष म्हणजे 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिलांना मिळणारी आर्थिक मदतच या कर्जाच्या परतफेडीसाठी वापरली जाणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.

### महिलांच्या कर्ज परतफेडीचा दर ९९ टक्क्यांपेक्षा जास्त

राज्य सरकारच्या विविध कर्ज योजनांचा आढावा घेतल्यास सर्वसाधारण कर्ज योजनांमध्ये परतफेडीचे प्रमाण सुमारे ५० टक्के असल्याचे दिसून येते. मात्र महिलांना बचत गट किंवा इतर माध्यमांतून दिल्या जाणाऱ्या कर्जाची परतफेड करण्याचे प्रमाण ९९ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे महिलांमध्ये कर्जाचा योग्य वापर करून सक्षम आर्थिक व्यवस्थापन उभारण्याची क्षमता असल्याचे स्पष्ट होत असल्याचेही फडणवीस यांनी नमूद केले.

## हरिहरपेठेत दोन गटात वाद, दगडफेक
## दोन्ही गटाच्या पाच जणांना घेतले ताब्यात

प्रतिनिधी ९ मार्च





**अकोला:** रविवारी रात्री उशिरा हरिहरपेठेतील गाडगे नगर, सोनटक्के प्लॉट भागात दगडफेक झाली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या प्रकरणी दोन्ही गटातील पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळते. पोलिस चौकशी करीत आहेत. प्राप्त माहिती नुसार या परिसरातील दोन्ही गटात जुना वाद आहे. त्या वादातून दगडफेक झाली. जुने शहर पोलिस तसेच आरसीपीची तुकडी देखील घटनास्थळी दाखल झाली होती. दोन्ही गटांना शांत राहण्याचे आवाहन वरिष्ठ पोलिस अधिका-यांनी दिली. तसेच चौकशी सुरू केली. घटनेतील दोषींवर कारवाई केली जाईल असे अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांनी सांगितले. स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक शंकर शेळके आणि अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते.

## भारत तिसऱ्यांदा विश्वविजेता !



**अहमदाबाद :** भारतीय संघाने टी-२० विश्वचषकावर नाव कोरलं आहे. भारतीय संघाने न्यूझीलंडला ९६ धावांनी पराभवाची धूळ चारली आहे. हा विजय मिळवून दैदीप्यमान कामगिरी करत भारतीय संघाने इतिहास रचला. या विजयाचे श्रेय सर्वच खेळाडूंचे असले तरी विजयाचे शिल्पकार पाच खेळाडू ठरले आहेत. ज्यांच्यामुळे भारतीय संघ विजयी ठरला आहे.

सेमी फायमन आणि फायनल सामन्यात संजू सॅमसनची कामगिरी लक्षवेधून घेणारी ठरली आहे. या खेळाडूने सर्वांचे मनं जिंकली आहेत. केरळचा यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन भारतासाठी अत्यंत महत्वाची कामगिरी करणारा खेळाडू ठरला आहे. त्याने सर्व सामन्यांमध्ये अर्धशतके ठोकली आहेत. सॅमसनने फलंदाजीसाठी आव्हानात्मक खेळपट्टीवर नाबाद ९७ धावांची आक्रमक खेळी करत भारताला आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत पोहोचवले. उपांत्य फेरीत इंग्लंडविरुद्ध आणि अंतिम फेरीत न्यूझीलंडविरुद्ध प्रत्येकी ८९ धावांची खेळी त्याने केली. तो या स्पर्धेत भारताचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला असून, त्याची 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून निवड करण्यात आली आहे.

जसप्रीत बुमराहने भारतीय संघाला जिंकून देण्यासाठी ज्या पद्धतीची गोलंदाजी करत बळी घेतल्याने विजयाची वाटचाल आणखी सोपी झाली. त्याने न्यूझीलंडविरुद्ध आपल्या कोट्यातील चार षटकांत १५ धावा देत ४ बळी घेतले. तो या स्पर्धेतील सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाजही ठरला आहे. त्याने ८ सामन्यात १४ बळी घेतली आहेत. ईशान किशन याने भारतीय संघासाठी ३ अर्धशतके झळकावली. फायनल सामन्यात त्याची कामगिरीत कौतुकास्पद ठरली. केवळ २१ चेंडूत त्याने ५२ धावा केल्या. यावेळी त्याचा २४७.६१ इतका स्ट्राइक रेट होता.

CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या
३ सोप्या किस्ती ११ महिने
मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त
१६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ताः- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

जिंदगी बेहतर करने का सुनहरा अवसर
WORK FROM HOME
संधी सर्वांसाठी, घर से काम करें
सभी के लिए बराबर अवसर?
Work Part Time/Full time
कौन कर सकता है?
स्टुडन्ट/ गृहिणी/ व्यापारी/नौकरी/ बेरोजगार/ व्यवसायी/ रिटायर्ड/ कर्मचारी जॉब करते हुए
-:संपर्क:-
9765357896

## बोर्डाच्या परीक्षेपूर्वीच शिकवणी वर्गाच्या सराव परीक्षेत 'ती'च प्रश्नपत्रिका?

प्रतिनिधी ९ मार्च

**नागपूर :** नागपुरतील खळबळजनक बारावीच्या पेपर फुटी प्रकरणीबाबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. बारावीच्या रसायनशास्त्रच्या पेपर फुटीप्रकरणी आता नवीन ट्विस्ट निर्माण झाला आहे. तीन वर्षांपूर्वी (२०२३ मध्ये) बोर्डाने सेट करून घेतलेली, मात्र तेव्हा न वापरलेली गोपनीय प्रश्नपत्रिका उमरेडच्या शिकवणी वर्गाकडे पोहोचली कशी? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहरातील 'टार्गेट अकॅडमी ऑफ सायन्सेस' मध्ये २५ जानेवारी रोजी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सराव चाचणीत रसायनशास्त्रचा जो पेपर वापरला गेला. तसेच १८ फेब्रुवारी रोजी जो पेपर बोर्डाने बारावीच्या परीक्षेसाठी वापरला, त्या दोन्ही प्रश्नपत्रिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर साधर्म्य आढळल्यामुळे उमरेडमध्ये पोलिसांनी गुन्हा दाखल करत टार्गेट ॲकेडमी ऑफ सायन्सेसचे संचालक अतुल चौधरी यांना अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी सेवानिवृत्त प्राध्यापक सतीश खर्चे यांनाही अटक केली. विशेष म्हणजे प्राध्यापक सतीश खर्चे नोकरीवर असताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळात कार्यरत होते. तेव्हा त्यांची नियुक्ती बोर्डासाठी बारावीच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी पण करण्यात आली होती. मिळालेल्या माहितीप्रमाणे तेव्हा प्रा. खर्चे यांनी २०२३ च्या बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेसाठी तयार केलेली, मात्र तेव्हा वापरली न गेलेली ती प्रश्नपत्रिका यंदा उमरेडच्या टारगेट ॲकेडमी ऑफ सायन्सेस या शिकवणी वर्गाकडे कशी पोहोचली? आणि तीच प्रश्नपत्रिका यंदा बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेत वापरली गेली का? असे अनेक प्रश्न या प्रकरणात निर्माण झाले आहे.

## मुंबईला उष्णतेच्या लाटेचा इशारा!

**मुंबई :** मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच मुंबई शहरात तापमानाने वाढ दाखवली आहे. काल मुंबईत पारा ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला होता. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत मुंबईचे तापमान अधिक वाढण्याची शक्यता असून, ते जवळपास ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याचा इशारा देण्यात आला आहे.

ही उष्णतेची लाट केवळ मुंबईपुरती मर्यादित नसून, रायगड, ठाणे आणि पालघर या संपूर्ण परिसरालाही त्याचा तडाखा बसणार आहे. पूर्वेकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे ही उष्णतेची लाट निर्माण झाली आहे.

## वर्ध्यात ज्येष्ठ नेत्याकडून मुलीचे लैंगिक शोषण !

प्रतिनिधी ९ मार्च

**वर्धा :** 'जागतिक महिला दिना'च्या पार्श्वभूमीवर समाजाला हादरवून टाकणारी ही घटना उघडकीस आली आहे. वर्ध्यात राजकीय पक्षाशी संबंधित एका ज्येष्ठ नेत्यावर अल्पवयीन मुलीचे दीर्घकाळपासून लैंगिक सुखाची मागणी केल्याचा गंभीर आरोप झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिवाकर गमे (७८) असे या आरोपीचे नाव असून पुलगाव पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पीडित तरुणीच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिस ठाण्यात पॉक्सो कायद्याअंतर्गत आणि इतर गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित मुलगी २०२२ मध्ये अवघ्या १७ वर्षांची असताना आरोपी दिवाकर गमे याने तिला नोकरीचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढले. गेल्या सुमारे पाच वर्षांपासून तिचे सातत्याने लैंगिक शोषणची मागणी केल्याचा आरोप आहे. धक्कादायक बाब म्हणजे आरोपीचे पीडित मुलीच्या कुटुंबाशी जवळचे संबंध असल्याची माहितीही समोर आली आहे. तसेच तीन दिवसांपूर्वी आरोपीने पीडितेला अश्लील फोटो आणि व्हिडिओ पाठवून पुन्हा तिचा लैंगिक छळ केल्याचा आरोप मुलीने केला आहे. यामुळे त्रस्त झालेल्या पीडित मुलीने अखेर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच पुलगाव पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखत ७ मार्चच्या सायंकाळी आरोपी दिवाकर गमे याला अटक केली. पोलिसांनी आरोपीचा मोबाईलही जप्त केला असून त्यातून आणखी धक्कादायक पुरावे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दिवाकर गमे हा 'महाज्योती' या संस्थेत काही वर्षांपूर्वी संचालक म्हणून कार्यरत होते.

दरम्यान, आरोपी हा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाशी संबंधित एका दिग्गज नेत्याचा निकटवर्तीय असल्याची माहिती समोर येत असून या प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी करत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## अजितदादांच्या विमान अपघाताची अपडेट समोर

प्रतिनिधी ९ मार्च

**पुणे :** अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणात व्हीएसआर कंपनी आणि कंपनीचे मालक रोहित सिंगवर अनेक गंभीर आरोप केले. तसेच हा अपघात नसून घातपात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. 'दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात प्रकरणात पायलट सुमित कपूर याची चूक आहे. अपघात प्रकरणात माझी चूक असेल तर मला कठोर शिक्षा करा,' असे व्ही.के.सिंग यांनी म्हटले आहे. या प्रकरणात तपास करणाऱ्या सीआयडीने पुण्यातील ऑफिसमध्ये व्हीएसआर कंपनीचे मालक रोहित सिंग यांना चौकशीसाठी बोलवलं होतं. पुणे सीआयडीने बीएसआर कंपनीचे मालक व्ही.के. सिंह यांची सलग तीन दिवस चौकशी केली आहे.

## लग्नाळू तरुणांचा प्रश्न विधानसभेत गाजला

**मुंबई** जागतिक महिला दिनानिमित्त विधानसभेत एकीकडे महिलांच्या सक्षमीकरणावर चर्चा सुरू असतानाच, दुसरीकडे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील एका अत्यंत ज्वलंत आणि गंभीर सामाजिक समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधले. 'ग्रामीण भागातील शेती करणाऱ्या तरुणांना लग्नासाठी मुली मिळेनाशा झाल्या असून, लग्नासाठी मुलांनाच हुंडा द्यावा लागत आहे. अशा शब्दांत सोळंके यांनी ग्रामीण तरुणांची व्यथा मांडली.



सिटी न्यूज अमरावती
सोमवार, दि. ९ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## थिलोरीत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न'

**दर्यापूर :** थिलोरी येथे महसूल व वन विभाग तथा तहसील कार्यालय दर्यापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले.

ग्रामपंचायत सभागृह परिसरातील हनुमान मंदिर येथे आयोजित या शिबिरात विविध शासकीय विभागांनी नागरिकांना थेट सेवा व मार्गदर्शन देत अनेक प्रशासकीय कामांना गती दिली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. शिबिराच्या माध्यमातून महसूल, कृषी, पुरवठा, आरोग्य, पशुसंवर्धन, नोंदणी व मुद्रांक, भूमी अभिलेख आदी विभागांच्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना दिली. तसेच महसूल व इतर विभागांच्या वतीने एकूण ९४ प्रकारचे विविध दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते नागरिकांना करण्यात आले.

# स्त्री ही प्रेरणा आणि भविष्याची ऊर्जा आहे - आमदार सुलभाताई खोडके

### ◆ आजच्या युगात स्त्रीची भूमिका व्यापक झाली आहे - आमदार सुलभाताई खोडके

प्रतिनिधी ९ मार्च



**अमरावती:** स्त्रीच्या स्वप्नात भविष्य घडवण्याची क्षमता असते. स्त्री केवळ कुटुंबातील सदस्य नाही, ती समाज परिवर्तनाची मोठी शक्ती आहे. पूर्वी स्त्रीची ओळख नात्यांपूरती मर्यादित होती. ती कोणाची तरी आई, मुलगी किंवा पत्नी होती. पण आज काळ बदलला आहे. स्त्रीने आज स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ती स्वतःच्या कर्तृत्वावर उभी आहे. ती स्वतःचे निर्णय स्वतः घेत आहे. ती स्वप्न पाहते आणि ती पूर्ण करते. समाजाची जुनी बंधने ती मोडून काढत आहे. आजच्या युगात स्त्रीची भूमिका व्यापक झाली आहे. शिक्षण, संशोधन आणि उद्योग अशा सर्वचं क्षेत्रात ती पुढे आहे. ग्रामीण भागातही महिलांनी क्रांती केली आहे. बचतगटांच्या माध्यमातून त्यांनी प्रगती साधली आहे. हस्तकला आणि शेतीपूरक व्यवसायातून त्यांनी कुटुंबाचा स्तर उंचावला आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा मिळाली आहे. स्त्रीच्या प्रगतीमागे तिचा आत्मविश्वास असतो. स्वतःवर विश्वास ठेवला की ती कोणत्याही संकटावर मात करते. प्रतिकूल परिस्थितीतून अनेक महिलांनी यश मिळवले आहे. स्त्री ही पुढील पिढी घडवणारी शक्ती आहे. मुलांवर चांगले संस्कार करण्यात तिचा वाटा असतो. त्यामुळे स्त्रीचे शिक्षण राष्ट्राच्या भविष्यासाठी आवश्यक आहे. महिला दिन म्हणजे केवळ सत्कार समारंभ नव्हे. महिलांना सुरक्षित आणि समान वातावरण देणे महत्वाचे आहे. प्रत्येक मुलीला तिच्या क्षमतेनुसार संधी मिळाली पाहिजे. तिच्या स्वप्नांना मर्यादा नसाव्यात. समाजाचे तिला भक्कम पाठबळ हवे. स्त्री हा एक आशेचा किरण आहे. तिच्या जिद्दीमुळे समाजात सकारात्मक बदल घडतात. या महिला दिनी आपण एक संकल्प करूयात. स्त्रीच्या क्षमतेवर विश्वास ठेवूया. तिचा आदर करूयात. समानतेवर आधारित समाज घडवण्यासाठी एकत्र काम करूयात. स्त्री ही प्रेरणा आहे आणि भविष्याची ऊर्जा आहे. तिचा सन्मान म्हणजेच मानवतेचा सन्मान आहे. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी पंचवटी चौक ते गर्ल्स हायस्कुल चौक मार्ग परिसर स्थित मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात विभागीय अभियंता विज राज्य परिवहन, अमरावती तसेच विभागीय कार्यालय विभागीय कार्यशाळा व सर्व आगारातील महिला कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिन २०२६ कार्यक्रमात त्या उदघाटक म्हणून त्या बोलत होत्या. राज्य परिवहन अमरावती, विभाग नियंत्रक - निलेश बेलसरे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रम याप्रसंगी व्यासपीठावर ॲड. नीलिमा राऊत, जिल्हा नियोजन अधिकारी - वर्षा भाकरे, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती पोलीस निरीक्षक - चित्रा मेसरे, प्रादेशिक व्यवस्थापक स. नि. स. क्रमांक - ५ रोहन पलंगे, आदी उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत माजी खेळाडू - योगिता जीवन वानखडे, एसटी बँकेच्या कनिष्ठ अधिकारी - शुभांगी तितरमारे, मीनल विपीन जोग, राधिका संदीप रायलवार, विभागीय अभियंता विज, राज्य परिवहन, अमरावती - श्रीमती विनादेवी गायकवाड आदी उपस्थित होते. सर्वप्रथम राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ तसेच क्रांतीज्योती सवित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस अतिथी मान्यवरांनी नमन - वंदन - पूजन - माल्यार्पण केल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाला उदघाटक म्हणून उपस्थित असलेल्या आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांचा आयोजकांच्या वतीने राज्य परिवहन महामंडळाच्या रणरागिनींनी शाल - श्रीफळ - पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अमरावती जिल्ह्यातील सर्व आगारातील उत्कृष्ट वाहक म्हणून सर्वोत्तम कामगिरी बजावीणाऱ्या महिला वाहक भगिनींचा अतिथी मान्यवरांच्या हस्ते स्मुर्तीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. जागतिक महिला दिना निमित्याने दरवर्षी प्रमाणे यंदाही सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान राज्य परिवहन महामंडळाच्या महिला भगिनींनी आपल्या अंगीभूत कलाकौशल्याचा परिचय करून देत उपस्थितांच्या समक्ष सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करीत त्यांनी टाळ्यांची दाद मिळवली असल्याचे दृश्य यावेळी दिसून आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन - विनादेवी गायकवाड यांनी तर प्रास्ताविक - शीतल मोहोड यांनी केले. कार्यक्रमाअंती सर्व उपस्थितांचे - वर्षा ठाकरे यांनी आभार मानले. याप्रसंगी राज्य परिवहन महामंडळाचे सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच परिवार सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला दिनानिमित्त 'स्त्री शक्ती वंदन' कृतज्ञता सोहळा उत्साहात

### ◆ डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात आजीवन महिला सभासदांचा भावपूर्ण सत्कार

प्रतिनिधी ९ मार्च



**अमरावती :** जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे 'स्त्री शक्ती वंदन' हा कृतज्ञता सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आजीवन महिला सभासदांना विशेष निमंत्रित करून त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोपटे देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील कार्यरत महिला प्राध्यापक व कर्मचारी महिलांचाही सन्मान करण्यात आला. महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा सन्मान सोहळा एक प्रेरणादायी व आगळावेगळा उपक्रम ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ होते. व्यासपीठावर संस्थेच्या आजीवन महिला सभासद डॉ. सुशीलाताई मुरके, भाग्यरेखाताई देशमुख, पुष्पाताई बंड, शीलाताई अर्डर, साहित्यिक मुक्ताताई केचे, नीलांबरीताई देशमुख, कांचनमालाताई गावंडे तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सर्व सत्कारमूर्ती महिलांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल करण्यात आलेला हा सन्मान विशेष लक्षवेधी ठरला.

सत्काराला उत्तर देताना आजीवन महिला सभासदांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, महिला दिनानिमित्त मिळालेला हा सन्मान आम्हाला अधिक प्रेरणा व बळ देणारा आहे.ङ्क यावेळी त्यांनी अनेक जुन्या आठवणींना उजाळा देत डॉ. पंजाबराव देशमुख व श्री शिवाजी शिक्षण संस्था यांच्यासोबत केलेल्या कार्याचा उल्लेख केला.

## अमरावतीत तीन कोटीचे एमडी ड्रग्स पकडले



**अमरावती :** आठ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता दरम्यान वाजण्याच्या सुमारास अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने नागपुरी गेट पोलीस स्टेशन हद्दीतील लाल खडी ते सुकळी वनारसी रोडवर आरोपी अब्दुल फहीम अब्दुल वय २५ वर्ष रा.आझाद नगर अमरावती, शेख आयान शेख रमजान वय २० वर्ष रा. द्वारका नगर अमरावती यांचे


### शहर गुन्हे शाखेची मोठी कारवाई

ताब्यातून २ किलो ८० ग्राम श्अकिंमत सुमारे ( ३,०१,२०,०००/-) जप्त केली आहे.पुढील कारवाई सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली क्राईम ब्रँच पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण व त्यांच्या पथकाने केली आहे.

## शहरात टीम इंडियाच्या विजयानंतर राजकमल चौकात जल्लोष

### ◆ मोदी है तो मुमकिन है, वंदे मातरम, भारत माता की जयच्या घोषणा

प्रतिनिधी ९ मार्च



**अमरावती :** रविवारी संध्याकाळी भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील रोमहर्षक अंतिम सामन्यात टीम इंडियाने अहमदाबादच्या मैदानावर प्रथमच ऐतिहासिक विजय संपादन केला. अमरावती शहरातील राजकमल चौकात मोठ्या पडद्यावर क्रिकेटप्रेमींनी आनंद लुटला. अंतिम सामना जिंकल्यानंतर हजारो क्रिकेट प्रेमीनी फटाके फोडून आनंद साजरा केला. हातात राष्ट्रध्वज भगवा ध्वज घेऊन जल्लोष करण्यात आला...

संपूर्ण अमरावती शहरात फटाक्यांच्या आतषबाजीने जल्लोष साजरा करण्यात आला... भारत माता की जय वंदे मातरम, मोदी है तो मुमकिन है, अशा घोषणा देत क्रिकेटप्रेमींनीही आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.. अनेक कुटुंब आपल्या लहान मुलांसह या उत्सवात सहभागी झाली होती.

भारताच्या विजयाच्या जल्लोषात अमरावती शहर पोलिस ँऊ पोलिसांचा मोठा बंदोबस्त दिसून आला ...या जल्लोषात हम सब एक है सह सर्व धर्म समभावाचे दृश्य पाहायला मिळाले.यावेळी अनेक क्रिकेट प्रेमीनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## स्वबळावर उभे 'आनंदी झुणका भाकर केंद्र'; निशा चव्हाण यांच्याकडून ९ महिलांना रोजगार

प्रतिनिधी ९ मार्च



**अमरावती :** शहरातील कोर्टा समोर सुरू करण्यात आलेले 'आनंदी झुणका भाकर केंद्र' अनेक महिलांसाठी आधार ठरत आहे. हे केंद्र निशा चव्हाण यांनी स्वतःच्या मेहनतीने उभे केले असून त्यातून त्यांनी नऊ महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.

निशा चव्हाण यांनी स्वबळावर हा उपक्रम सुरू करत महिलांना कामाची संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू असलेल्या महिलांना रोजगार मिळाला असून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद मिळत आहे. या केंद्रात काम करणाऱ्या महिलांना नियमित उत्पन्न मिळत असल्याने त्यांच्या कुटुंबांनाही मोठा आधार मिळाला आहे. 'आनंदी झुणका भाकर केंद्र'मध्ये ग्राहकांना घरगुती पद्धतीने बनवलेले झुणका-भाकर व इतर पदार्थ मिळतात. चवदार व परवडणाऱ्या दरात मिळणाऱ्या जेवणामुळे या केंद्राला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. निशा चव्हाण यांनी स्वतःचा व्यवसाय उभा करत इतर महिलांनाही रोजगार दिला असून त्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या या प्रयत्नामुळे महिलांच्या स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे दिसून येत असून प्रत्येक महिलांसाठी हा ऐक चांगला अनुभव आहे.

## महिलांना रोजगाराच्या संधी देण्याचा किरण वानखडे (काळे) यांचा पुढाकार

प्रतिनिधी ९ मार्च

महिला दिन विशेष



**अमरावती :** रोजगाराच्या क्षेत्रात महिलांना स्वबळावर उभे राहण्यासाठी मदत करण्याचे महत्त्वपूर्ण काम किरण वानखेडे / काळे करत आहेत. त्या Aureus hR Solutions LL या कंपनीच्या डायरेक्टर असून गेल्या सहा ते सात वर्षांपासून रोजगाराच्या क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत.

कंपनीच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे. विशेषतः महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणे हे कंपनीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या काळात Aureus hR Solutions LLP मार्फत विविध कंपन्यांमध्ये मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात आले आहे. आतापर्यंत १००० पेक्षा जास्त महिलांना रोजगार मिळवून देण्यात कंपनीला यश आले आहे. त्यामुळे अनेक महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून आले आहेत. किरण वानखेडे / काळे यांच्या मते हे केवळ नोकरीचे काम नसून समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची एक जबाबदारी आहे. एखादी महिला स्वतःच्या कष्टाने कमवू लागली की तिचा आत्मविश्वास वाढतो आणि तिचे कुटुंबही अधिक सक्षम होते.

आगामी काळातही Aureus hR Solutions LLP च्या माध्यमातून अधिकाधिक महिलांना आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

## मोर्शीत एकात्मिक प्रशासकीय इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी ९ मार्च



**अमरावती:** मोर्शी येथील नागरिकांच्या सुविधेसाठी नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य एकात्मिक प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्र्यांनी इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करून प्रत्यक्ष इमारतीची पाहणी केली. याप्रसंगी खासदार डॉ. अनिल बोंडे, अमर काळे, आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, राजेश वानखडे, नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने, ईश्वर सलामे, सुवर्णा वरखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार आणि तहसीलदार सागर ढवळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, मोर्शी येथील या नवीन इमारतीची रचना अत्यंत उत्तम असून, नागरिकांना विनाविलंब आणि पारदर्शक सेवा देणे हेच प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असावे. शासन सध्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आकृतिबंध अंतिम करत असून, पात्र व्यक्तींना पदोन्नती देऊन प्रशासन अधिक गतिमान केले जात आहे. 'गतिमान शासन, पारदर्शी प्रशासन' हे सूत्र घेऊन महसूल विभाग काम करीत आहे. शासनाने 'जीवंत सातबारा' लागू केला असून छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान शिबिरांच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी दिला जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

## स्व. संजय ठाकरे पाटील यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी

प्रतिनिधी ९ मार्च



**खामगाव :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, जिल्हा परिषदचे माजी सदस्य तथा सकल मराठा सेवा संघटना व छत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक स्व. संजय ठाकरे पाटील यांची जयंती दि.६ मार्च रोजी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम सकाळी ९ वाजता जलंब नाका स्थित सकल मराठा सेवा संघटनेच्या कार्यालयात स्व.संजय ठाकरे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता जिल्हा सामान्य रुग्णलयात रुग्णांना फळ वाटप, १० वाजता लॉयन्स क्लब खामगाव द्वारा संचालित लॉयन्स अन्नछत्र येथे रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना भोजनदान, ११ वाजता जलंब नाका स्थित सकल मराठा सेवा संघटनेच्या कार्यालयासमोर वाटसरूंसाठी मोफत पाणपोईचे उद्घाटन, ११.३० वाजता स्व. संजयभाऊ ठाकरे पाटील बळीराजा आत्मसन्मान योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत, दुपारी १.३० वाजता रेल्वे स्टेशन येथे खामगाव अनाथ, अनवानी व्यक्तींना स्लिपर चप्पलचे वितरणासह आदी लोकोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले.

या कार्यक्रमांना काँग्रेसचे खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील, काँग्रेस तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, अल्पसांख्यक विभागाचे सचिव मो.वसीमुद्दीन, जिल्हा कांग्रेस उपाध्यक्ष जुलकर नैन शेख चांद, जेष्ठ नेते राजाराम कालने, खामगाव शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, डॉ.निखिल ठाकरे, अतुल शिरसाठ, संतोष देशमुख, नगरसेवक मूसा भाई, सुरेशसिंह तोमर, अस्लम पटेल, प्रकाश टिकार, सचिन जयसवाल, अनंता ताठे, निलेश देशमुख, गजानन देवचे, वासुदेव सोळंके, कैलास ताठे ,पवन लांडे, जगदीप चौधरी, किशोर गवांडे, शामराव लांडे, दामोदर ताठे, संजय तायडे, प्रमोद चिंचोलकर, कैलास साबे, गजानन मुळीक, अजय पवार, अक्षय पात्रे, विनोद माळवंदे, सतेंद्र ठाकुर, अक्षय शंकरवार पंकज गमे, नितीन पाटील, सुमित बेंद्रे, जालिंदर चौधरी, रूपेश पाकधाने, भारत पाटिल, अंकित डिडवाणीया, संजय जवंजाल, सुधाकर डुकरे, शुभम कालूसे, शैलेश चोपड़े, मसब खाऩ, वैभव गायकवाड़, भूषण पथरे, संजय खराटे, गोपाल मारखेड़े , संतोष चव्हाण, श्रीनाथ पांडे, दीपक ठाकरे, जय बघेल, अमीत तायडे, घनश्याम सावरकर, अनिल ठाकरे, पंकज घोगले, अजिंक्य कंकाले, विलास नवसागर, लोमेश भोयर, प्रमोद हिंगने, श्रीहरि टीकार, विठ्ठल पाटिल, गजानन हींगने, पुरशु रामेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खामगांव अर्बन बँक कर्मचारी दत्त उपासक मंडळाचे वतीने पक्षांकरीता जलपात्राचे वितरण

प्रतिनिधी ९ मार्च



**खामगाव :** खामगांव अर्बन बँक कर्मचारी दत्त उपासक गणेशोत्सव मंडळाचे वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळात पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा केला जातो, उत्सवादरम्यान विविध सांस्कृतीक, कौटुंबिक व सामाजीक कार्यक्रम घेण्यात येत असतात. तसेच मंडळाच्या वतीने अनावश्यक खर्चात कपात करून वर्गणीतील शिल्लक राहणारी रक्कम गरजु गौरक्षणातील गौमातेच्या चारा-पाण्यासाठी देणे, गरजु विद्यार्थ्यांकरीता वह्या-पुस्तकांचे वाटप करणे, अशा समाजोपयोगी कार्य करण्याचा प्रयत्न करुन टिळकांना अभिप्रेत असलेला गणेशोत्सव साजरा केला जातो. यावर्षी उन्हाची तिव्रता लक्षात घेवून शिल्लक वर्गणीतून दि. ०६/०३/२०२६ संकष्ट चतुर्थीचे दिवशी फरशी चौक, खामगांव येथे पक्षांकरीता मोफत जलपात्रांचे मंडळाच्या वतीने पक्षीप्रेमींना वितरण करण्यात आले. याप्रसंगी ज्यांच्या कामामुळे हा उपक्रम राबविण्याची प्रेरणा मिळाली असे पक्षी व पर्यावरण रक्षणाकरीता कार्य करीत असलेले अ. खि. नॅशनल हायस्कूलचे श्री. संजयजी गुरव सर, श्री. चितारे सर, सामाजीक कार्यकर्ते श्री. देविदास शर्मा, नेहमी सहकार्य करीत असलेले बैंकेचे अध्यक्ष प्रा. विजयजी पुंडे सर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ज्ञानेश्वरजी जाधव साहेब यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी चितारे सर यांनी मनोगत व्यक्त करतांना खामगांव अर्बन बँकेच्या सामाजिक बांधिलकी व मंडळाच्या उपक्रमाची स्तुती केली तर गुरव सर यांनी हृदयस्पर्शी कवितेतून पक्षीप्रेम व्यक्त केले.

# सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. ९ मार्च २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## पाटील समाज महिला मंडळातर्फे ११ मार्चला महिला दिन कार्यक्रम

**अकोला:** पाटील समाज महिला मंडळ अकोला तर्फे बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी महिला दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्थानिक जुन्या आर टी ओ कार्यालया समोरील मराठा सेवा संघाच्या सभागृहात दुपारी ४ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अकोला महानगरपालिकेच्या महापौर सौ. शारदा ताई खेडकर याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांकरिता पाककला स्पर्धेसह इतरही काही कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाकरिता समाजातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बहाकर, कार्याध्यक्षा रूपाली नाकट, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, जिल्हा संघटिका सरिता वाकोडे, उपाध्यक्षा अर्चना पाटील, मुख्य मार्गदर्शिका प्रा. डॉ. ममता इंगोले, कोषाध्यक्षा स्वाती बारब्दे, संगीता ताथोड, सोनाली मोरे, वर्षा पोरे, संगीता दाळू, संगीता वानखडे, रेणुका पाथ्रीकर, सुमित्रा काकड, वनमाला ठाकरे, जयश्री राऊत यांनी केले आहे.

## बुध्दीबळ, कॅरम व टेबल टेनिस स्पर्धेतील मातृशक्तीचा गौरव



**अकोला:** स्थानिय गोरक्षण रोड येथील ब्रिलियंट चेस अकादमी व प्रो कोड अकादमीच्या वतीने जागतिक महिला दिनावर महिलासाठी मोफत बुध्दिबळ, कॅरम व टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन केले होते. यास मातृशक्तीनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या आगळ्या वेगळ्या स्पर्धांचा प्रारंभ प्रो कोड अकादमीच्या संस्थापिका वर्षा पटेल,

एसओएस शाळेच्या प्राचार्या डॉ श्वेता दिक्षीत, जीवन प्रेरक सौ कविता खंडेलवाल, प्रशिक्षक जितेन्द्र अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी उपस्थित महिला खेळाडुना मार्गदर्शन करीत त्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. यातील बुध्दिबळ स्पर्धेत प्रथम सेजल गायकवाड आल्यात. द्वितीय करुणा इगळे विजेत्या ठरल्यात. कॅरम स्पर्धेत प्रथम ५७ वर्षीय माधुरी पिपळे तर द्वितीय ७० वर्षीय रजनी खांडरे यांनी पारितोषिक पटकाविले. टेबल टेनिस स्पर्धेत प्रथम माधुरी साबळे, द्वितीय पारितोषिक सुजाता वाकोडे याना देण्यात आले.

## शिवर येथे शिवजयंती उत्साहात; रक्तदान शिबिराला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** अकोला महानगरपालिका प्रभाग क्रमांक १३ अंतर्गत येणाऱ्या साईनगर, शिवर येथे छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला युवकांनी स्वयंस्फूर्तीने प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

कार्यक्रमाला ॲड. नितीन धुत, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल जंजाळ, ॲड. क्रिष्णा सोमाणी, निलेश खडसान, मनन जाधव, सागर अंबासकर, मयूर गावंडे, हरी गडम, अमोल खेसे, तेजस जाधव, दीपक चव्हाण, नयन जाधव, राम नेमाडे, शिवराज राऊत, रेहान खान, महेश देशमुख, प्रमोद मिश्रा, ओम सांगळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## महिला दिनानिमित्त विद्यानिकेतन येथे महिलांचा सन्मान

प्रतिनिधी ९ मार्च

**अकोट:** स्थानिक संत वासुदेव विहार येथील विद्यानिकेतनमध्ये महिलादीना निमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना डॉ. पूजा हागे यांनी देश, समाज आणि कुटुंब घडविण्यात आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून स्त्रीच्या जीवनातील 'आई' ही जबाबदारी सर्वात महत्त्वाची असते असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर्किटेक्ट अनंत गावंडे होते. कार्यक्रमाची सुरुवात युगपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी डॉ. पूजा हागे यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून आईची भूमिका आणि जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले.




यावेळी अध्यक्षीय मनोगतात आर्किटेक्ट अनंत गावंडे यांनी आजच्या काळात कामकाजी महिलांसमोर संस्कारीत पिढी घडविण्याचे मोठे आव्हान असून त्यासाठी प्राथमिक शिक्षणाची योग्य निवड अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. प्राथमिक शाळा निवडताना पालकांनी कोणती काळजी घ्यावी याबाबतही त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यानिकेतनच्या संचालिका प्रा. प्रिर्ती ठाकरे यांनी केले. या कार्यक्रमात पूजा गुप्ता, सुजाता सदांशिव, वृषाली आंबडकार, प्रियंका गोरडे, कोमल वडेरीया, कविता चुटे, कोमल सरवदे व ढोकणे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी अमोल पवार, सार्थक ढोबळे, किशोर सोळंके आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रिती ठाकरे यांनी केले.

## एसटी बस रस्त्याच्या कडेला उतरली



प्रतिनिधी ९ मार्च

**हिवरखेड:** अकोट हिवरखेड मार्गावर खंडाळा आणि चितलवाडी फाट्यादरम्यान एसटी बस रस्त्याच्या कडेला उतरून पाईपलाईनला धडकली. रविवारी दुपारी ही घटना घडली. अनेक प्रवाशांचा जीव थोडक्यात वाचला. घटनेची माहिती मिळाल्यानौतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. प्रवाशांना दुसऱ्या बसची व्यवस्था करून देण्यात आली. नादुरुस्त बस बराच वेळाने तेथून हटवण्यात आली. भर उन्हात हा प्रकार घडल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला.

## हिवरखेड सौंदळा मार्ग धुळीने माखला

प्रतिनिधी ९ मार्च



**हिवरखेड:** हिवरखेड सौंदळा मार्गावर धुळीचे प्रमाण वाढल्याने या रोडवरील शेती पिकांसाठी समस्या निर्माण झाली आहे. आपल्या शेतातील पिकांची नासाडी धुळीने होऊ नये म्हणून स्वखर्चाने स्प्रिंकलरने पाईप लावून रोडवर पाणी टाकावे लागत आहे. रोडवर धूळ कमी व्हावी या उद्देशाने एका शेतकऱ्याने हा प्रयोग केला.

धुळीमुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना देखील त्रास होत आहे. श्वसनाचे विकार जडण्याची शक्यता आहे. बांधकाम विभाग याकडे लक्ष देईल का अशी विचारणा केली जात आहे. कारण सध्या उन्हाळा सुरू झाला तसेच वातावरणात कोरडेपणा आल्यामुळे धुळीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. याला आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी आहे.

## अकोल्याच्या लोकसंचालित साधन केंद्राचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते सन्मान

प्रतिनिधी ९ मार्च

### महिला बचत गटांसाठी स्वतंत्र इमारतीची उभारणी



**अकोला :** अकोला येथील डाबकी रोड जुने शहर भागात लोकसंचालित साधन केंद्राने महिला बचत गटासाठी उत्कृष्ट कार्य केले आहे. तसेच त्यांनी स्वखर्चातून 'तेजस्विनी भवन' नावाची स्वतंत्र इमारत उभारली आहे. या त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुंबई येथील कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या राज्यभरातील उत्कृष्ट काम केलेल्या महिलांचा, संस्थांचा सत्कार, ७ मार्च रोजी रवींद्र नाट्यमंदिर मुंबई येथे महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माविमच्या एमडी यांच्या द्वारे आयोजित महिला आयोगाच्या राज्यस्तरीय कार्यक्रमांमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा अकोला येथून उत्कृष्ट काम व लोकसंचालित साधन केंद्राचे अस्तित्व 'तेजस्विनी' भवनांच्या माध्यमातून साकारल्या गेले. त्यामुळे लोकसंचालित साधन केंद्र अकोलाच्या अध्यक्ष कल्पना निचळे, सुवर्णा वाघमारे, ईसी सभासद थोरात, लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक सोनाली अंबरते, जुन्या सहयोगिनी लता आठवले, पद्मा खेळकर यांच्यासह जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे या संपूर्ण टीमचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याद्वारे सन्मान करण्यात आला. या बद्दल अकोला लोकसंचालित साधन केंद्राच्यावतीने प्रा. नंदिनी आवडे, व्यवस्थापकीय संचालक महिला आर्थिक महामंडळ मुंबई आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

## ऑपरेशन प्रहार अंतर्गत गोवंश तस्करीवर कारवाई; वाहनासह ३.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ९ मार्च



**अकोट:** अकोट ग्रामीण पोलिसांनी ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत गोवंशीय प्राण्यांची तस्करी करणाऱ्या आरोपीवर कारवाई करत मालवाहू वाहनासह दोन गोवंश जातीचे बैल असा एकूण ३ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ७ मार्च २०२६ रोजी अकोट ग्रामीण पोलीस पेट्रोलिंग करीत असताना काही तस्कर अंजनगाव सुर्जी येथून अकोट–अंजनगाव मार्गाने कत्तलीसाठी गोवंशीय प्राणी आणत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार अकोट–अंजनगाव रोडवरील वाई फाटा समोरील पठार नाल्याजवळ पोलिसांनी पंचांसह नाकाबंदी केली.

दरम्यान, अंजनगावकडून अकोटकडे येणारे महिंद्रा सुप्रो कंपनीचे मालवाहू वाहन (क्रमांक एमएच २७ बीएक्स ८२५४) थांबवून त्याची तपासणी करण्यात आली. वाहनचालकाने आपले नाव शेख मुजाहीद शेख मजीद (वय २१ वर्ष, रा. भालदारपुरा, आयडिया टॉवरजवळ, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) असे सांगितले.

पंचांसमक्ष वाहनाची झडती घेतली असता वाहनाच्या मागील भागात दोन गोवंश जातीचे बैल निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी वाहतूक करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी दोन बैल (किंमत ६५ हजार रुपये) व मालवाहू वाहन (किंमत ३ लाख रुपये) असा एकूण ३ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २६८/२०२६ अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(अ), ९ तसेच प्राण्यांवरील क्रूरतेस प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात पोहेकॉ उमेशचंद्र सोळंके, पोलीस कॉन्स्टेबल राजेश माळेकर व सुनील पाटील यांनी केली.

## आगीत घराची राख झालेल्या कुटुंबीयांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण

प्रतिनिधी ९ मार्च



**आलेगाव :** पातूर तालुक्यातील नवेगाव येथील घरामध्ये दिनांक ६ रोजी गॅस सिलेंडरचा स्पोट झाला होता. त्यामध्ये जीवित हानी झाली नसली तरी रामकृष्ण कळणू खुळे राहत असलेल्या संपूर्ण घराची राख झाली असून घरातील जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या त्यामुळे सदर पीडित कुटुंबीयांकडे अंगावरील कापडा शिवाय काहीच शिल्लक उरले नव्हते. त्यामुळे, सदर परिवार उघड्यावर आला, असून त्यांना उदरनिर्वाहासाठी लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची गरज असताना पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरान खान मुमताज खान यांनी दिनांक ८ रोजी नवेगाव येथे जाऊन सदर आगीत राख झालेल्या घरांची पाहणी करून कुटुंबीयांची भेट घेत विचारपूस केली. तसेच सदर परिवारास वस्त्र आणि जीवनावश्यक किराणा आदी वस्तूंचे वितरण केले. तसेच शासकीय मदत मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून मदतीचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. या वेळी कुटुंबीय, सामाजिक कार्यकर्ते राजिक भाई, निलेश करवते, अमित ताजने, सुभाष ताजने, नंदू गिऱ्हे, भीमराव तेलगोटे, देवनाथ तेलगोटे, साबीर भाई, प्रदीप भाऊ, सह ग्रामस्थ मंडळी हजर होते.

## वसतीगृह प्रवेश, आधार व स्वयंम योजनेस मुदतवाढ, राज्यातील २१,६०० विद्यार्थ्यांना लाभ

प्रतिनिधी ९ मार्च

### ◆ डॉ. सुधीर ढोणे यांच्या पाठपुराव्यास यश



**अकोला:** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन शासकिय वसतिगृह, आधार व स्वयंम या योजना १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे. यावर्षी या योजनेची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ ही दिली होती. परंतु अनेक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया ३१ डिसेंबर पर्यंत चालल्याने अनेक विद्यार्थी या योजनेपासुन वंचित राहिले होते. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते डॉ. सुधीर ढोणे यांनी या योजनेस मुदतवाढ मिळावी यासाठी बहुजन कल्याण विभागाचे मंत्री, अप्पर मुख्य सचिव व उपसचिव यांना प्रत्यक्ष भेटुन निवेदन दिले व मुदतवाढीची मागणी केली. विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेता बहुजन कल्याण विभागाने या योजनेस याआधी दि. ६ ते १५ फेब्रुवारी पर्यंत व आता दि. २५ फेब्रुवारी ते १० मार्च पर्यंत मुदतवाढ दिली आहे. डॉ. सुधीर ढोणे यांच्या पाठपुराव्यास यश आल्याने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये १२ वी नंतर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ऑनलाईनरित्या राबविण्यात आलेली आहे. मात्र वसतिगृहात निवड यादीनुसार प्रवेश देऊनही अद्याप जागा रिक्त राहिल्याने वसतिगृह प्रवेश, आधार, स्वयंम योजनेसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (भटक्या जमाती मधील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१६०० विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येत आहे. व भटक्या जमाती मधील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागु आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना १० महिन्यासाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता म्हणुन रू. ६० हजार, इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणार्या रू. ५१ हजार, इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगरपालिकेच्या हद्दीपासुन ५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालये/शैक्षणिक संस्था या ठिकाणी शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना रू. ४३ हजार, तालुक्यात उच्च शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना रू ३८ हजार मिळणार आहेत.

महानगर पालिका हद्दीमधील महाविद्यालयामंध्ये १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणार्या सन २०२५-२६ मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यानी शासन निर्णयान्वये प्रथमतः वसतिगृह प्रवेशाकरिता अर्ज करणे अनिवार्य आहे. ऑनलाईन प्रणालीमध्ये आधार/स्वयंम योजना निवडून अर्ज भरण्याचा प्रयत्न केल्यास आधी तालुका दिसणार नाही. त्यामुळे वसतिगृहाचा अर्ज भरावा. त्यानंतर मंजुर झालेल्या अर्जाचा आरक्षण निहाय गुणवत्तेनुसार शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश दिल्या जाईल. तसेच निवड प्रक्रिया झाल्यानंतर व वसतिगृहातील १०० टक्के जागा भरल्यानंतर उर्वरीत अर्जांचा आधार/स्वयंम योजनेकरीता आरक्षण निहाय गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल. तालुक्याचे ठिकाण असलेल्या शहराच्या ठिकाणी नगरपालिका, नगरपरिषद हद्दीमध्ये कार्यरत महाविद्यालयांमध्ये १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणार्या तसेच २०२५-२६ या शैक्षणिक सत्रामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी जे भाडयाने राहत आहेत अशा इच्छुक विद्यार्थ्यांनी वसतिगृह न निवडता थेट आधार/स्वयंम योजनेकरिता अर्ज भरावा.

## शिवसेना आगामी निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना आव्हान देणार

प्रतिनिधी ९ मार्च

**पातूर:** आमदार तथा उपनेते नितीन देशमुख यांच्या निष्ठावान पदाधिकाऱ्यांची बैठक बाभूळ बनात झाली. बैठकीत पातुर नगरपरिषद, शिरला ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेवर सत्ताधाऱ्यांना धूळ चाटून विजय संपादन करण्याची आखणी करण्यात आली. काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

काही दिवसापासून गटातटाच्या राजकारणात एकमेकांना संपविण्याचे कट कारस्थान करणारे, वृक्ष लागवड भ्रष्टाचार, खोट्या खऱ्या तक्रारीवरून झालेला त्रास, रोजगार सेवकाची नवीन भरती, पंचायत समिती निवडणुकीत पराभवाचे खापर, नगरपरिषद निवडणूक झालेला अपमान, कामे मिळवण्यासाठी झालेली धडपड अशा अनेक घडामोडीला तिलांजली देऊन आज या बैठकीत सर्व मतभेद विसरून एका ठिकाणी बसून येणाऱ्या निवडणुकीत विजय प्राप्त करण्याचा संकल्प करण्यात आला.

नगरपरिषदवर आघाडीचा नगराध्यक्ष व शिरला ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद पंचायत समिती गणावर शिवसेनेचा भगवा फडकेल असा आशावाद यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## मांडेकर परिवारात महिला सन्मान सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी ९ मार्च



**अकोला:** स्थानिक शिवाजीनगर येथील मांडेकर परिवारात महिला दिनानिमित्त परिवारातील महिलांचा सन्मान करण्याकरिता पुरुषांच्या पुढाकाराने सन्मान सोहळ्याचे आयोजन ८ मार्च २०२६ रोजी करण्यात आले.

महिलांच्या कर्तृत्वाची दखल घेण्यात येऊन त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता परिवारातील योगेश मांडेकर, अंकित मांडेकर यांनी महिला दिनाचे औचित्य साधून महिला सन्मान सोहळ्याचे आयोजन परिवारातील जेष्ठ महिला सौ. लताबाई मांडेकर यांच्या अध्यक्षतेत केले. यावेळी व्यासपीठावर परिवारातील सौ. रेणुकाबाई, सौ. सीमाताई, सौ. शिलाताई, सौ. वर्षाताई, सुनबाई पायल व परिवारातील मुलगी डॉक्टर श्रेया उपस्थित होत्या. प्रथम व्यासपीठावरील सर्व महिलांचे कुमकुम तिलक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगेश मांडेकर यांनी करून व्यासपीठावरील महिलानी त्यांचे विचार, अनुभव, भावना व्यक्त केल्यात. परिवारातील पुरुष मंडळींनी महिलांच्या पुढाकाराने परिवार पुढे जात आहे असे विचार व्यक्त करीत देश, राष्ट्र, जिल्हा, तालुका, गाव, परिसर स्तरावरील स्तरावरील महान महिलांच्या कार्याला उजाळा सभे समोर ज्ञानेश्वर मांडेकर यांनी ठेवून यामधून सर्वांनी प्रेरणा घ्यावी व आपले जीवन समृद्ध करीत परिवारातील देणे सहज शक्य आहे असे अनुभवातून विचार व्यक्त केले. परिवारातील कर्ते महादेव मांडेकर, पुरुषोत्तम मांडेकर, गोपाल मांडेकर यांनी महिलांच्या कार्यालयाच्या कार्याचा उजाळा देवून मार्गदर्शन केले तर महिलांनी कार्यक्रमाला उत्तर देताना पुढील प्रगतीच्या धोरणावर विचार व्यक्त करीत कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. या पारिवारिक उत्साही कार्यक्रमाची सांगता अंकीत मांडेकर यांनी आभार प्रदर्शन केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ९ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# रोहीणी घाटावर रेती उत्खननावर कारवाई

## ११ वाहने, दोन बोटी व दोन पोकलॅण्ड जप्त; २० जणांवर गुन्हा

प्रतिनिधी ९ मार्च



**राळेगाव :** तालुक्यातील रोहीणी येथील वर्धा नदीपात्रातील रेती घाटावर सुरू असलेल्या अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर पोलीस व महसूल विभागाने संयुक्त धडक कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत ११ रेती वाहतूक करणारी वाहने, दोन बोटी व दोन पोकलॅण्ड मशिन असा सुमारे १ कोटी ४२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून २० जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

८ मार्च रोजी पहाटे सुमारे १.३० वाजता पांढरकवडा येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांना रोहीणी येथील रेती घाटावरून अवैध रेती वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार उपविभागीय अधिकारी राळेगाव, तहसीलदार राळेगाव तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक वडकी यांच्या समन्वयाने पथक तयार करून संयुक्त कारवाईचे नियोजन करण्यात आले. रात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास अंतरगाव मार्गाने रोहीणी घाटावर धाड टाकण्यात आली. यावेळी रेती चोरी करताना वापरली जाणारी ११ वाहने, दोन बोटी आणि दोन पोकलॅण्ड मशिन आढळून आली. संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, खान व खनिज अधिनियम तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

या प्रकरणात चालक विनोद गोविंदा नेहारे (अडपुर, ता. कळंब), निलेश महादेवराव ढबाले (माणिकवडा, ता. नेर), किसन लक्ष्मण सोनावणे (ब्राम्हणवाडा पूर्व, ता. नेर), उत्तम शेषराव गोहने (अंबिकानगर, यवतमाळ), राजू सुखदेवराव जगनकर (कोळा मारोती मैदान परिसर, कळंब), शे. अलताफ शे. अजिज (चमननगर, नेर), नरेश गायकी येलंकार (भोयर, ता. यवतमाळ) व कुनाल गणेश ठाकरे (पिंपळगाव बुटले ले-आउट, यवतमाळ) या चालकांसह तीन चालक फरार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच घाटमालक प्रसाद मनोहरराव मालखेडे याच्यासह ट्रक मालक नरेंद्र पाटील (वडगाव), अगोल तंबाके (नेर), अक्षय गुल्हाने (नबाबपुरा, नेर), सचिन बारसकर (वंजारी फैल, यवतमाळ), राजीक खान (मजीदजवळ, कळंब), सतीश भोयर (उदापुर, ता. नेर), अंकुश खोपडे (भोयर, जि. यवतमाळ) व दिनेश महल्ले (पोतदार शाळेजवळ, यवतमाळ) यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंथा आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक खरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व महसूल विभागाच्या संयुक्त पथकाने केली.

# जेफ्री एफस्टीन प्रकरणाविरोधात महिलांचा निषेध मोर्चा

प्रतिनिधी ९ मार्च



**यवतमाळ :** दरवर्षी ८ मार्च हा दिवस International Women's Day म्हणून साजरा केला जातो. मात्र यंदा यवतमाळमध्ये महिलांनी जल्लोष करण्याऐवजी Jeffrey Epstein प्रकरणाच्या निषेधार्थ मोर्चा काढत अन्यायाविरोधात आवाज उठवला.

महिला, विद्यार्थिनी आणि काही सजग नागरिक मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले. घोषणांद्वारे त्यांनी महिलांच्या न्याय आणि सुरक्षिततेचा मुद्दा ठामपणे मांडला. समाजात महिलांवरील अन्यायाविरोधात जागृती निर्माण व्हावी, हा या मोर्चामागील मुख्य उद्देश होता.

मोर्चा सुरू असताना रस्त्याच्या कडेला कपड्यांच्या दुकानात ठेवलेले स्टॅच्यू अनेकांच्या नजरेत भरत होते. त्या स्टॅच्यूंकडे पाहताना काहींना असा विचार मनात आला की, देशात कितीही गंभीर परिस्थिती निर्माण झाली तरी काही लोक बघ्याच्या भूमिकेत उभे राहतात; अगदी त्या स्टॅच्यूसारखे. मात्र यवतमाळमधील महिलांनी बघ्याची भूमिका न स्वीकारता अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचा मार्ग निवडला.

समता मैदान येथून सुरू झालेला हा निषेध मोर्चा B. R. Ambedkar यांच्या पुतळ्याजवळील संविधान चौकात येऊन थांबला. या मोर्चातून समाजात जागृती आणि संवेदनशीलतेचा महत्त्वाचा संदेश देण्यात आला.

महिला दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहण्याची जाणीव करून देणारा दिवस असल्याचे यवतमाळच्या महिलांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

# लोहारा परिसरात विजेचा लपंडाव



प्रतिनिधी ९ मार्च

**यवतमाळ :** मागील काही दिवसांपासून लोहारा परिसरात विजेचा लपंडाव सुरू आहे. वीज केव्हा खंडित होईल याचा नेम राहिलेला नाही. प्रामुख्याने सकाळच्या वेळात हा प्रकार सुरू आहे. याविषयी वीज कंपनीकडे विचारणा केली असता समाधानकारक उत्तर दिले जात नाही. वीज कंपनीच्या वरिष्ठांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी या परिसरातील नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

# लोहार लाईन पुसदमध्ये जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी ९ मार्च

**पुसद :** शहरातील लोहार लाईन परिसरात किराणा दुकानात झालेल्या वादातून एका तरुणावर धारदार चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची घटना ७ मार्च २०२६ रोजी घडली. या प्रकरणातील फरार आरोपीला पुसद शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने शिताफीने अटक केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अल्ताफ हुसेन अब्दुल अजीज चव्हाण (रा. लोहार लाईन, पुसद) यांनी पुसद शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले की, ते त्यांच्या किराणा दुकानात असताना दुकानात आलेल्या एका ग्राहकास आरोपी बिलाल फारुख चव्हाण (वय २५, रा. अमराईपुरा, सुभाष वॉर्ड, पुसद) हा वाद घालून मारहाण करीत होता. त्यावेळी अल्ताफ यांनी "तू येथे ग्राहकाला का मारहाण करीत आहेस?" असे विचारल्यावर आरोपी संतापला. यानंतर "तू कोण मला सांगणारा" असे म्हणत आरोपीने फिर्यादीशी वाद घालत "तुला जिवे ठार मारतो" अशी धमकी दिली आणि धारदार चाकूने त्यांच्या छातीवर व हातावर वार करून गंभीर जखमी केले. फिर्यादीचे भाऊ सोडविण्यासाठी आले असता त्यांनाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर आरोपी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला. जखमींवर वैद्यकीय उपचार करून पुसद शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या अहवालावरून भारतीय न्याय संहिता कलम १०९, ११८(१), ३५१(२) (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अक्षय सनगर करीत आहेत.

**आरोपीला डी.बी.पथकाची अटक**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी डी.बी. पथकाला आरोपीचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार गुप्त माहितीच्या आधारे आरोपी हा पुस नदीजवळील वॉटर सप्लाय परिसरात दबा धरून बसल्याची माहिती मिळाली. त्यावरून डी.बी. पथकाने सापळा रचून आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना मोठ्या शिताफीने पकडून अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमकुमार केदार, पोलीस उपनिरीक्षक अक्षय सनगर, पोलीस हवालदार मनोज कदम, पोलीस कॉन्स्टेबल शुद्धोधन भगत, आकाश बाभुळकर व सचिन राऊत यांनी केली.

# अमीर इरफान चव्हाण याचा पहिला रोजा

प्रतिनिधी ९ मार्च

**आर्णी :** रमजान महिन्याची चाहूल लागताच सर्वत्र रोजा आणि नमाजसाठी लगबग सुरू झाली आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण रोजा ठेवण्यासाठी उत्सुक असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



याच पार्श्वभूमीवर मुबारक नगर येथील जेष्ठ नागरिक अकबर चव्हाण यांचा नातू व इरफान चव्हाण यांचा मुलगा अमीर इरफान चव्हाण याने आपला पहिला रोजा ठेवला. कडक उन्हात तासभर पाण्याशिवाय राहणेही अवघड असताना सुमारे १४ तास उपाशी राहून अमीरने रोजा पूर्ण केला. लहान वयात दाखवलेल्या या श्रद्धा व संयमाबद्दल परिसरात त्याचे कौतुक होत आहे. अमीरने पहिला रोजा ठेवत रमजानच्या पवित्र महिन्याचे स्वागत केले असून कुटुंबीय व नातेवाईकांनी त्याचे अभिनंदन केले.

# पोस्को कायद्यावरील प्रशिक्षणातून बाल संरक्षणाबाबत जागरूकता वाढणार

प्रतिनिधी ९ मार्च

**यवतमाळ :** आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे. अशा परिस्थितीत 'बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२' (POCSO) कायद्याची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक असून या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे बाल संरक्षणाबाबत जागरूकता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

जागतिक महिला दिनाच्या औचित्याने ८ मार्च २०२६ रोजी मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या संकल्पनेतून पोक्सो कायद्यावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा बाल संरक्षण कक्ष, महिला व बाल कल्याण विभाग व शिक्षण विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद सभागृहात जिल्ह्यातील सर्व केंद्रप्रमुखांसाठी या विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यशाळेत 'बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२' (POCSO Act) या कायद्याच्या तरतुदी, शिक्षकांची भूमिका तसेच बाल संरक्षण यंत्रणेची माहिती देण्यात आली. मुख्य मार्गदर्शिका अ‍ॅड. ज्योती खांडपासोळे यांनी POCSO कायद्यांतर्गत गुन्ह्यांचे स्वरूप, शिक्षेच्या तरतुदी तसेच पोलीस प्रशासन, बाल कल्याण समिती (CWC), जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाइन व इतर शासकीय विभागांची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांनी बालविवाह प्रतिबंधाबाबत शपथही घेतली.

कार्यशाळेस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा. क.) विशाल जाधव, शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष वासुदेवराव डायरे, सदस्य अनिल गायकवाड व लीना आदे, शासकीय मुलांचे बालगृह व निरीक्षण गृहाचे अधीक्षक गजानन जुमळे तसेच परिविक्षा अधिकारी रवींद्र गजभिये आदी उपस्थित होते.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये बाल लैंगिक शोषणापासून संरक्षणासाठी विविध उपाययोजना तसेच जनजागृती सत्रांचे आयोजन जिल्हा बाल संरक्षण कक्ष व शिक्षण विभागामार्फत करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजुरकर, स्वप्नील शेटे, महेश हळदे, माधुरी पावडे, आकाश बुर्रेवार तसेच चाईल्ड हेल्पलाइनचे फाल्गुन पालकर, गणेश आत्राम, मनीष शेळके, पूजा शेलारे, पूनम कनाके व अश्विनी नासरे यांनी सहकार्य केले.

# ब्रेन हॅम्बरेजने तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी ९ मार्च

**आर्णी :** येथील रहिवासी रिजवान रहुफ बेग मिर्झा यांचे ब्रेन हॅम्बरेजमुळे दुर्दैवी निधन झाले. शनिवारी (दि. ७) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्रकृती अचानक बिघडली. ब्रेन हॅम्बरेजचा झटका आल्याने त्यांना तातडीने नागपूर येथील एम्स रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान रविवारी (दि. ८) पहाटे सुमारे ३ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.



त्यांच्या अकाली निधनामुळे आर्णी शहरासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. स्व. रिजवान मिर्झा हे आर्णी येथील स्वर्गीय आगा बेग यांचे नातू होत. आगा बेग यांनी गावचे पहिले सरपंच म्हणून काम पाहिले होते. तसेच त्यांचे वडील स्वर्गीय रहुफ बेग यांनीही ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्य केले होते. त्यामुळे त्यांच्या निधनाबद्दल सामाजिक व राजकीय क्षेत्रातून शोक व्यक्त करण्यात येत आहे. स्व. रिजवान रहुफ बेग मिर्झा यांचा अंत्यविधी रविवारी (दि. ८) आर्णी येथील नवीन मुस्लिम कब्रस्तानमध्ये पार पडला.

यावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते व त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व आप्तपरिवार आहे.

# पाटणआई देवस्थानात पंचमीनिमित्त भाविकांची गर्दी

प्रतिनिधी ९ मार्च





**झरी जामणी :** तालुक्यातील माथार्जुन येथील प्रसिद्ध पाटणआई देवस्थान येथे होळीच्या पाच दिवसांनी साजऱ्या होणाऱ्या पंचमी निमित्त भाविकांची मोठी गर्दी उसळली. आदिवासी समाजासह विविध समाजातील भक्त मोठ्या श्रद्धेने देवीच्या दर्शनासाठी येथे दाखल झाले होते.

भाविक माता पाटणआईसमोर आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात यासाठी साकडे घालत होते. तसेच देवीला स्वयंपाक (नैवेद्य) अर्पण करून विधिवत पूजा करण्यात आली. परिसरातील तसेच दूरदूरच्या गावांमधून मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले.

या देवस्थानाला विशेष धार्मिक महत्त्व असून अनेक भाविक नवस फेडण्यासाठी येथे येतात. पंचमीच्या निमित्ताने मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# नगराध्यक्षांनी घेतला नाट्यगृहाचा आढावा

प्रतिनिधी ९ मार्च



**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील सांस्कृतिक परंपरेचे महत्त्वपूर्ण केंद्र असलेल्या नाट्यगृहाला नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनी भेट देत नाट्यगृहातील विविध सुविधांची सविस्तर पाहणी केली.

या भेटीदरम्यान प्रेक्षकांसाठी असलेली आसनव्यवस्था, स्वच्छता, प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था तसेच कलाकारांना उपलब्ध असलेल्या बॅकस्टेज सुविधांचा आढावा घेण्यात आला.

यवतमाळ शहरातील सांस्कृतिक, सामाजिक आणि कलात्मक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी हे नाट्यगृह महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. शहरातील कलाकार, नाट्यप्रेमी आणि विविध सांस्कृतिक संघटनांना अधिक चांगले व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी नाट्यगृहातील आवश्यक सुधारणा व सोयी-सुविधा अधिक सक्षम करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

शहरातील कला, संस्कृती आणि नाट्यपरंपरेला चालना देण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध असून भविष्यातही अशा सांस्कृतिक स्थळांचा विकास करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील, असे नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनी यावेळी सांगितले. नागरिकांना दर्जेदार सांस्कृतिक अनुभव मिळावा तसेच स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी योग्य मंच उपलब्ध व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# प्रत्येक महिलेने आपल्या हक्कांची सुरक्षितता जपली पाहिजे

## नगराध्यक्षा प्रियदर्शिनी ऊइके यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ९ मार्च

**यवतमाळ :** आज सर्वच क्षेत्रात महिलांप्रति समान भाव ठेवून त्यांना समान संधी उपलब्ध होत आहेत. मात्र यासाठी अनेक महापुरुष व महान स्त्रियांनी संघर्ष केला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे स्मरण ठेवत प्रत्येक महिलेने आपल्या हक्कांची सुरक्षितता जपली पाहिजे, असे प्रतिपादन यवतमाळच्या नगराध्यक्षा अ‍ॅड. प्रियदर्शिनी अशोक ऊइके यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त यवतमाळ नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने आयोजित महिला मेळावा व शहरातील कर्तृत्ववान महिलांच्या सत्कार सोहळ्यात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणात त्या पुढे म्हणाल्या की, आधुनिक युगातील आजची स्त्री प्रगत आणि स्वावलंबी झाली आहे. स्वतःच्या आवडी-निवडी जपत ती कुटुंबाचा आधार बनत समाजात पुढे येत आहे. शिवशक्तीतली शक्ती असणारी स्त्री अशीच पुढे येत राहिली, तर देशाला निश्चितच बळकटी प्राप्त होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक तथा दामिनी पथक प्रमुख यशोधरा मुनेश्वर यांनी केले. त्यांनी उपस्थित महिलांना संबोधित करताना सांगितले की, शासन महिलांच्या हक्क व सुरक्षिततेबाबत गंभीरपणे कार्य करत आहे. महिलांनीही स्वतःची काळजी घेत निडरपणे अन्यायाविरुद्ध लढले पाहिजे. सर्व स्तरांवरील शोषणाविरुद्ध निसंकोचपणे आवाज उठविण्याचे आवाहन त्यांनी केले.




याप्रसंगी न. प. उपाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, सत्कारमूर्ती माया चव्हाण, डॉ. अंजली गवारले, नीता भास्कर केळापुरे, महिला व बालकल्याण सभापती शोभा साबळे, उपसभापती सोनाली तिडके, आरोग्य सभापती लता ठोंबरे, शिक्षण सभापती प्रियंका भवरे, नियोजन सभापती रिता धावतोडे, स्थायी समिती सदस्या रेखा कोठेकर, चैताली बेलोकर, साधनाताई काळे, नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे, भारत ब्राह्मणकर आदी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्षांसह शहरातील प्रत्येक प्रभागातील दोन कर्तृत्ववान महिलांचा मानचिन्ह व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

नगरसेविका कीर्ती संतोष राऊत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर प्रशासनाच्या वतीने सुनील वासनिक यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्वागत समितीच्या स्वाती खंडारे, सोनाली मडावी, माया शेरे, शीला मिर्झापूरे, संगीता बोबडे, शोभा हर्षे, मनीषा भावे, वनिता बडे, साधना शंभरकर, शाहीन परवीन, कुमारी श्रद्धा भडके, तबसुम शाह, शेख अंजुम परवीन, किरण प्रजापती, मीरा वीर आदींनी परिश्रम घेतले.

# प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधनपर्व समितीच्या अध्यक्षपदी लक्ष्मण कांबळे

प्रतिनिधी ९ मार्च

**पुसद :** येथे दि. ४ मार्च २०२६ रोजी युनियन बँक चौक परिसरातील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव प्रबोधनपर्व आयोजन समिती, पुसदच्या २०२६ च्या अध्यक्षपदासाठी समाजबांधवांची सभा पार पडली.



या सभेला नगर परिषद पुसदचे शिक्षण सभापती विठ्ठल खडसे, प्रबोधनपर्व समितीचे माजी अध्यक्ष विश्वास भवरे, प्रा. कल्याण साखरकर, प्रा. मिलिंद सोमकुंवर, अ‍ॅड. यादवराव जाभुंळकर, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेचे जिल्हाध्यक्ष गणपत गव्हाळे, बामसेफचे संतोष सुरवाडे, भगवान हनवते, दीपक कांबळे, अविनाश भवरे, भारत कांबळे, बंडू गंगावणे, रिपाईचे ज्येष्ठ नेते प्रकाश धुळे, प्रा. अंबादास वानखडे, व्हडगिर सर, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव, नितेश खंदारे, भास्कर बनसोड, गुरू उचाडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उपस्थित ज्येष्ठ मंडळींनी प्रबोधनपर्व समितीच्या पुढील कार्यक्रमांबाबत मार्गदर्शन केले व आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी लक्ष्मण सदाशिव कांबळे यांची प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव प्रबोधनपर्व आयोजन समिती, पुसदच्या २०२६ च्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

तसेच मावळते अध्यक्ष संतोष आंभोरे (२०२५) यांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाला समाजबांधव, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. ९ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्याची...

# दादागिरीची ठेकेदारी लांबली, रद्द करण्याची कारवाई थांबली !

## पार्कींगमध्ये दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी तक्रारीचा लढा...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात असलेल्या पार्कींगचा ठेका मागील अनेक वर्षापासून एकाच ठेकेदाराला रेल्वे प्रशासन देत असल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. पार्कींगचा ठेकेदार हा वादग्रस्त असून त्याच्या पार्कींग करण्याच्या दादागिरीने वाशीम परिसरातील सर्व वाहनचालक परेशान झाल्याचे समजते. ठेकेदाराच्या दादागिरीला रेल्वेचे अधिकारी आणि रेल्वे पोलीसांचे आर्थिक पाठबळ असल्यामुळेच त्या ठेकेदाराकडून दररोज रेल्वे स्टेशनवर ये-जा करणाऱ्या वाहन चालकांची खुलेआम आर्थिक लूट सुरू असल्याचे वास्तव आहे. त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करण्यासाठी विविध सामाजिक संघटना व ग्राहक संघटनांनी पुढाकार घेतला असून एकत्र येणार आहेत. दादगिरीच्या ठेकेदारी रद्द करण्यासाठी अनेक तक्रारी केल्या असून रद्द न करण्याचा करार भ्रष्ट व ठेक्यात भागिदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी केला आहे. अनेक गुन्हे दाखल असूनही हा मग्रूर ठेकेदार फरार आहे. भ्रष्टअधिकाऱ्यांनी तक्रार करूनही ठेकेदारी रद्द करण्याची कारवाई थांबविली आहे. त्यामुळे दादागिरी करणाऱ्याची ठेकेदारी लाबली आहे.



वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षापासून दुचाकी, तिनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्कींगची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. रेल्वे प्रशासनाने व अनेक वर्षापासून पार्कींगचा ठेका घेणाऱ्या वादग्रस्त ठेकेदाराने वाहनांच्या सुरक्षिततेसाठी टिनशेडची सुविधा सुद्धा उपलब्ध करुन दिली नाही. पार्कींगसाठी शेड नसल्यामुळे वाहन चालकांची दररोज पार्कींगमध्ये ठेवलेली वाहने उन्ह, वारा, पावसाचा त्रास सहन करत असल्याचे चित्र आहे. रेल्वेस्टेशन वर येणाऱ्या रेल्वे गाडीच्या वेळेवर अथवा वेळेच्या अगोदर प्रवाशांना, नातेवाईकांना आणून सोडण्यासाठी अथवा घेण्यासाठी येणाऱ्या आप्तेष्ठांना सुद्धा जबरीने, दादागिरी करून पार्कींगचा वादग्रस्त ठेकेदार वाहने पार्कींगमध्येच लावण्याची सक्ती करून वाहनचालक, मालकांची आर्थिक लूट करत आहे. रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमोर व स्टेशनवर ड्युटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संगनमतानेच वादग्रस्त ठेकेदाराची अरेरावी व दादागिरी खुलेआम सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.

रेल्वे पार्कींगचा ठेकेदार असलेल्या ठाकूरची गुन्हेगारीची पार्श्वभूमी असल्याची चर्चा आहे. पार्कींगचा ठेका घेण्याअगोदर ठाकूर ने रेल्वे आवाराच्या गेटला लागून असलेल्या एका गरीब व्यक्तीच्या जागेवर अतिक्रमण केले होते. त्या गरीब माणसाची जागा सोडण्यासाठी ठाकूरने दादागिरी करून त्या गरीब माणसाला खूप त्रास दिला होता. ठाकूरच्या जाचाला कंटाळून त्या गरीब माणसाला त्याच्या मालकीची आणि व्यवसायासाठी उपयोगी असलेली जागा कमी भावाने विकावी लागल्याची चर्चा आहे. रेल्वे स्टेशनच्या आवारात होणाऱ्या गुन्हेगारीच्या प्रकारात सहभागी असलेल्या आरोपींना सुद्धा वादग्रस्त ठेकेदाराची साथ असल्याचीही स्टेशन परिसरात चर्चा आहे. वाशीम शहर पोलीस ठाण्यात पार्कींगच्या वादग्रस्त ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याचे समजते. वाशीम शहर पोलीसांनी वादग्रस्त ठेकेदाराची कसून चौकशी केल्यास अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करावा तसेच पार्कींगसाठी टिनशेड उपलब्ध करून देण्याची मागणीही विविध सामाजिक संघटना आणि ग्राहक संघटनेने रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे समजते.

### यांनी केल्या तक्रारी....

ग्राहक पंचायतचे अध्यक्ष, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष, डी.आर.यु.सीसीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी, झेड.आर.यु.सीसीचे सदस्य सुरज चौधरी, प्रविण जाधव, शंकरराव इंगोले, गणेश पाथे, काशिनाथ शिंदे, सिध्दार्थ धाबे, किसन इंगोले, दिपक पांढरे, दिपक शिंदे, शुभम सोळंके, विठ्ठल मोरे, शुभम थोरात, संतोष खडसे, संतोष वानखेडे, सागर अगम, भारत घुगे, जयदेव इंगळे, राजु टोकळे, सुनिल गुडदे, हमीद बेनिवाले यासह शेकडो सामाजिक संघटनांनी व त्रस्त प्रवाशांनी तक्रार केली आहे.

## थोडक्यात

### सैनिक बॉबी वैद्य यांचे त्रिरत्न बुद्ध विहारासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

समाजाबद्दल कृतज्ञता ठेवत समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपणारे खिर्डा येथील जवान बॉबी भिमराव वैद्य यांनी त्रिरत्न बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान देऊन आदर्श निर्माण केला आहे.

भारतीय सैन्यात महार रेजिमेंटमध्ये जनरल ड्यूटी पदावर कार्यरत असलेले बॉबी वैद्य सध्या अरुणाचल प्रदेश येथे चीन सीमेवर देशसेवा बजावत आहेत. गेल्या सात वर्षांपासून ते सैन्यात कार्यरत आहेत. दि. ६ मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नियोजना संदर्भात बैठक घेण्यात आली होती. या वेळी देशसेवेबरोबरच समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सैनिक बॉबी वैद्य यांनी आपल्या वडिलांच्या कालकथीत भिमराव मानाजी वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ खिर्डा येथील त्रिरत्न बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान सर्व समाजबांधवां समोर रोख रक्कम देऊन केले.

### शाक्यमुनी संस्थे मार्फत जागतिक महिला दिन साजरा



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळनाथ येथील पंचवटी श्री सोमनाथ देवस्थानामध्ये होलिका उत्सव निमित्त पर्यावरण पूरक होळी साजरी केली असून त्याच अनुषंगाने भावी भक्तांना व वाटसरूंना उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये थंड पाणी मिळावे म्हणून पानपोई सुद्धा लावण्यात आली. पाणपोईचे उद्घाटन नगराध्यक्ष अशोक भाऊ परळीकर व ठाणेदार किशोर शेळके साहेब यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पानपोळीचे उद्घाटन करण्यात आले .

यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक सौ किरण ताई परळीकर युवा नेतृत्व सचिन भाऊ परळीकर एड, श्री प्रकाशराव इंगोले नगरसेवक श्रीहरी पाटील इंगोले माधवराव पाकधने रामदास उत्तरवार अनिल पटेल विश्वनाथ कोलते अनिल पडघान विजय भोजने सुरेश पाटील, श्रीमती सुनिता पाटील, राजेश पाटील गिरडेकर ,उमेश इंगोले ,सुशील राठोड, सोनू कलेसर गौरव कुमार इंगळे सर्व भास्कर मुळे आदित्य पाटील, तसेच वृक्षप्रेमी व पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रम कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडावा म्हणून भास्कर मुळे पाटील व मुळे मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले.

## जगण्याची कळ, महागाईची झळ !

### बांधकाम साहित्यासह जीवनावश्यक वस्तूचे दर गगनाला

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ, हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे. घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ झाली आहे.

## ग्रामीण खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

परंपरेने चालत आलेले ग्रामीण खेळ आता नावापूरतेच उरले आहेत. यामध्ये मल्लखांब, कबड्डी, खो-खो सुरपारंब्या, विटी - दांडू यासारखे विविध ग्रामीण खेळ दिवसेंदिवस ग्रामीण भागातूनही हद्दपार झाल्याचे चित्र दिसत आहे. कारण मोबाईलमुळे लाहन मुले मैदानी खेळ विसरले असून मोबाईलमध्येच बिजी झाले आहेत. मोबाईलच्या वापरामुळे शारिरीक व मानसीक तानही वाढत असल्याचे दिसून येते.



शहरीकरणाच्या कचाट्यात मैदानी खेळांचे महत्व दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. मागील अनेक वर्षापासून शहराऐवजी ग्रामीण भागात हे खेळ पहावयास मिळायचे परंतु आता ही परिस्थितीही बदलली आहे. शाळेचे मैदान अथवा घरासमोर जागेत चेंडू आणि बॅटने क्रिकेट खेळणाऱ्यांचे प्रमाण जास्त झाले आहे. शहरी भागात मैदानी खेळापेक्षा इतर खेळांना आधिक महत्व दिले जात आहे. बहुतेक विद्यार्थी बुध्दीबळ कॅरम, मोबाईलवरील ऑनलाईन खेळांकडे वळले आहेत. संगणकी करणाच्या युगात संगणकावरील खेळही मुलांमध्ये अवडीचा विषय आहे. मैदानी खेळामध्ये क्रिकेट वगळता अन्य खेळ खेळताना पहावयास मिळत नाही. परंतु फुटबॉलसारख्या खेळत रस असणाऱ्याची संख्या कमी नाही शहरी भागातील या आवडीनिवडी आता ग्रामीण भागातही पोहोचल्या आहे. विटीदांडू हा खेळ कालबाह्य झाला आहे. तर कबड्डी, खो -खो यासारखे खेळ फक्त शालेय, महाविद्यालयीन स्पर्धापुरते मर्यादित असल्याचे दिसत आहे. मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वृतोडीमुळे सूरपारंब्यासारखे खेळ दिसत नाहीत.




### कुस्ती जिवंत...

तालुक्यातील पेंडू चाटोरी या ठिकाणी यात्रेनिमित्त कुस्तीचा फड मात्र दिसत आहे. अनेक ठिकाणी कुस्तीचे आखाडे पाहावयास मिळत आहेत. तालुक्यात अल्प प्रमाणात का होईना कुस्ती स्पर्धेत यात्रेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या जात आहे. कबड्डी खो-खो यासारखे खेळ ग्रामीण भागात तग धरून आहे या खेळाचा प्रसारवाढीसाठी राज्य शासनाने नव्या योजना आखण्यात यासह प्रलंबित असलेल्या मैदानाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ग्रामीण भागात नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## वाशीम येथील फुले मार्केट नव्हे "फेल मार्केट"!

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

नगरपरिषदेच्या वतीने शहरातील मोक्याच्या जागी बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या महात्मा फुले संकुलाची आजघडीला दुरावस्था झाली असून या संकुलाची स्वच्छता व देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकासकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील दुकानदारांच्या व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे.



### जिकडे तिकडे चोहीकडे घाणच घाण

येथील दुकानदारांकडून कर व भाडे न.प.ला भरणापोटी काही रक्कम या संकुलाच्या देखरेखीसाठी नियुक्त केलेल्या विकासकाला मिळत असते हे येथे उल्लेखनिय. माहितीच्या अधिकारान्वये या संकुलाबाबतच्या महत्वपुर्ण कागदपत्रांची मागणी केली असता ही कागदपत्रे अमरावती येथील विभागीय कार्यालयात जमा असल्याचे सांगण्यात आले. याबाबत अधिक वृत्त असे की, लघु व्यवसायीकांच्या व्यवसायासाठी येथील रविवार बाजारात नगर परिषदेच्या वतीने महात्मा फुले संकुल उभारण्यात आले आहे. व्यापारीक दृष्टीकोनातून उभारण्यात आलेले हे संकुल न.प.पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या ठिसूळ नियोजनामुळे पुर्णत: 'फेल मार्केट' म्हणून कुप्रसिध्द झाले आहे. सगळीकडे घाण, दुर्गंधी, अस्वच्छता या चक्रात सापडलेल्या या संकुलाचा वापर आजघडीला गदुल्ले, नशेबाज, पत्तेबाज, अवैध दारुविक्री, अवैध वरली मटक्यासाठी उपयोगात येत आहे. त्यामुळे या डोकेदुखीला संकुलातील लघुव्यवसायीकांना सामोरे जावे लागत आहे. संकुलात भाजीपाला विक्रेत्यांसाठी नगर परिषदेने गाळे तयार केले आहेत. मात्र भाजीपाला विक्रेते या गाळयात बसण्याऐवजी खुल्या जागेतच भाजीपाला विक्री करत आहेत. त्यामुळे मोकळ्या असलेल्या या जागेचा वापर रात्रीच्या वेळेस हागणदारीसाठी व दिवसा मुत्रीघर म्हणून होत आहे. संकुलात कामासाठी येणारे नागरीक दुर्गंधीमुळे नाकाला रुमाल लावूनच येतात. येथील वातावरणामुळे महिला वर्ग तर येथे येण्यासही धजावत नाहीत.

वाशीम मतदार संघाला लखन मलीक यांच्या रुपाने भारदस्त व निस्वार्थी आमदार मिळाले आहेत. येथील लघु व्यवसायीक व्यापाऱ्यांनी संकुलातील परिस्थीतीबाबत सुधारणा होण्यासाठी आमदारांना सुध्दा निवेदने दिली आहेत. मात्र त्यांच्या आमदारकीचाही प्रभावही संकुलाची सुधारणा होण्यासाठी कुचकामी ठरत आहे. त्यामुळे नगर परिषदेसोबतच लोकप्रतिनिधी बाबतही येथील लघु व्यवसायीकांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत.

## प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'

### मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल





●सिटी न्युज ब्युरो @ मानोरा●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्गप्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. ९ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मनपाच्या पहिल्या सभेत आठ नवीन सदस्यांची नियुक्ती



प्रतिनिधी ९ मार्च

## शहरातील नालेसफाई नियोजनाच्या चर्चेवर सभेत घमासान

**अकोला :** आज महापालिकेची सभा भविष्यात कशाप्रकारे चालतील याची एक झलक आज पहावयास मिळाली. मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे नामनिर्देशित सदस्यांची अहर्ता व नियुक्ती करणे तसेच अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीवर महापालिकेच्या एका प्रतिनिधीची नियुक्ती करून पाठविणे या विषयांना घेऊन महापालिकेत सकाळी ११ वाजता पहिल्या सभेस सुरुवात झाली. सुरुवातीस सर्व आठ स्वीकृत सदस्यांच्या नावाची घोषणा पिठासीन अधिकाऱ्यांनी केली. यामध्ये नगर सुधार आघाडीचे एडवोकेट गिरीश गोखले सुनील मेश्राम चंदा शर्मा एडवोकेट देवाशिष काकड सर काँग्रेस तर्फे अलीयाज खान अलियार खान, आकाश कवडे शिवसेना उद्धव ठाकरे गटातर्फे शंकरराव लंगोटे तर वंचित बहुजन तर्फे सुनील इन्नानी त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

उपस्थित सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले तर महापौरांनी सर्वांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीवर महापालिकेच्या एका सदस्याची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करून पाठविण्याबाबत झालेल्या चर्चेवर उत्तर देताना स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सांगितले की शासनाने यावर्षीपासून सर्कुलर काढले आहे की कुठल्याही कृषी उत्पन्न बाजार समितीवर आता महापालिकेच्या एका सदस्याची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येणार नाही त्यामुळे हा विषय तेथेच थांबला त्यानंतर विरोधी पक्ष नेते निलेश देव आणि वंचित बहुजन चे नगरसेवक पराग गवई यांनी सभागृहात पत्रकारांच्या प्रवेशावर मज्जाव आनल्या बाबत विरोध केला. तुम्ही पत्रकारां पासून महापालिकेचा कारभार लपविण्याचा प्रयत्न करीत आहात असा आरोप पराग गवई यांनी केला त्याला उत्तर देताना स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सांगितले की यात लपवायचा काही एक प्रयत्न नाही कारण सर्वांना टीव्हीवर दिसत आहे सभागृहात जागा अपुरी असल्याने पत्रकारांना बसण्यास जागा नाही त्यामुळे त्यांची व्यवस्था महापुराच्या कॅबिन समोरील हॉलमध्ये करण्यात आलेली आहे पुढे योग्य वेळी पत्रकारांना प्रवेश देण्याबाबत विचार करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले.

**स्वीकृत नगरसेवकाची पहिल्याच सभेत दादागिरी!**

काँग्रेसच्या नगरसेविका शाहीन अंजूम यांनी त्यांच्या प्रभागातील सफाईच्या समस्या मांडण्यास सुरुवात केली असता भाजपाचे गटनेता पवन महले यांनी त्यांच्या प्रभागातील समस्या लवकरच सोडविल्या जातील असे म्हणतात काँग्रेसचे नव्यानेच स्वीकृत सदस्य बनलेले गुड्डू पठाण यांनी आपणास मध्ये बोलण्याचा अधिकार नाही असे दरडावुन सांगितले, त्यामुळे भाजपाच्या सदस्यांनी त्यांना हे लोकशाहीचे मंदिर असून येथे महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे हे पाहता अशी दादागिरी योग्य नसल्याचे सांगून दादागिरी करायची असल्यास बाहेर भरपूर जागा आहे अशा शब्दात खडसावले. तसेच संपूर्ण शहर आपण नागरिकांच्या समस्या सभागृहात कशाप्रकारे मांडत आहोत हे टीव्हीवर पाहत आहेत हे सर्व नगरसेवकांनी लक्षात ठेवावे असे सूचित केले शहरातील नालेसफाई च्या नियोजनात घेऊन झालेल्या चर्चेवर सभेत घमासान पाहावयास मिळाले. शहरातील सर्व मोठ्या नाल्यांची सफाई जेसीबी मशीन द्वारे तर लहान लहान नाल्याची सफाई मनुष्यबळांमार्फत करण्यात येईल तसेच सफाईचा ठेका ज्या ठेकेदारांना मिळेल त्या ठेकेदाराने नाल्यातून निघालेला कचरा व गाळ त्याच दिवशी उचलावा जर कचरा व गाळ तेथेच राहिल्यास ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल अशी तरतूद करण्यात यावी तसेच नाले सफाई चा रेट संबंधित ठेकेदारा मार्फत वर्षभरासाठी स्क्वेअर फुट प्रमाणे घेण्यात यावा तसेच या या कामाचा सर्वे करून निविदा काढा व सर्व नगरसेवकांना एसएमएस पाठवा असे निर्देश सुद्धा सभापतींनी या सभेत दिले.

**पत्रकार कक्षातील टीव्हीचा आवाज फटाके व ढोल ताशाच्या आवाजात दबला**

◆एकीकडे पत्रकारांना सभेपासून दूर ठेवून त्यांची व्यवस्था महापौरांच्या दालना समोरील हॉलमध्ये करण्यात आली होती परंतु अगोदरच टीव्हीचा आवाज कमी होता त्यातच नव्याने नियुक्त झालेल्या स्वीकृत नगर सेवकांच्या समर्थकांनी गजानन भाऊ ढोल ताशे व फटाक्याची आतिशबाजी केल्याने महापालिकेच्या सभेत माइक वर सदस्य काय बोलत आहेत हे ऐकू येईनासे झाले होते. त्यामुळे सभागृहात काय चालू आहे याची काही एक माहिती मिळणे मुश्किल झाले होते महापालिकेचे प्रवेशद्वार बंद केल्याने व आत स्वीकृत सदस्यांच्या समर्थकांचा जल्लोष सुरू असल्याने आपल्या विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांना बाहेरच ताटकळत बसण्याची वेळ आली होती

# शेतकऱ्याची मुलगी ज्ञानेश्वरी ठाकरे बनली सीए

प्रतिनिधी ९ मार्च

**अकोट :** तालुक्यातील रामापूर गावातील अल्पभूधारक शेतकरी प्रदीप ठाकरे यांची मुलगी ज्ञानेश्वरी चार्टर्ड अकाउंटंट झाली. गावातून पहिली सी.ए. होण्याचा मान तिने मिळवला. या यशामुळे ठाकरे कुटुंबासह गावात आनंद व्यक्त झाला. मूळचे रामापूर येथील ठाकरे कुटुंब वडिलांच्या नोकरीनिमित्त चिखली येथे स्थायिक झाले. ज्ञानेश्वरीचे प्राथमिक शिक्षण आदर्श कॉन्हेंट चिखली येथे झाले. शैक्षणिक प्रवसात सातत्यपूर्ण गुणत्ता राखत तिने दहावी उत्तम गुणांनी उत्तीर्ण केली. त्यानंतर वाणिज्य शाखेची निवड करून उया शिक्षणासाठी पुणे येथे प्रवेश घेत तिने सी.ए होण्याचे स्वप्न जोपासले. परिश्रम, सातत्य, चिकाटीच्या जोरावर यशस्वी झाली. तिच्या यशाचे कौतुक करण्यात आले.



# महिला दिनानिमित्त 'अस्मिता लीगचा शुभारंभ'

प्रतिनिधी ९ मार्च

## ♦ युवती व महिला क्रीडापटूंनी घडविले स्त्री शक्तीचे दर्शन



**अकोला :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त केंद्रीय क्रीडा मंत्रालय, मेरा युवा भारत केंद्र व जिल्हा प्रशासनाच्या वतीने वसंत देसाई क्रीडांगण येथे अस्मिता लीगचे आयोजन आज करण्यात आले.

महाविद्यालयांच्या विद्यार्थिनी, युवती व महिला यांनी स्पर्धेत सहभागी होत स्त्री शक्तीचे दर्शन घडवले.

विद्यार्थिनी व महिलांसाठी १३ वर्षांखालील, १३ ते १८ वर्ष, १८ हून अधिक अशा तीन वयोगटात धावण्याची स्पर्धा झाली. १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर इतक्या अंतराच्या या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील युवती व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेल्या मान्यवर महिला क्रीडापटू, विद्यार्थिनी क्रीडापटू यांच्या हस्ते मशाल पेटवून उपक्रमाचा शुभारंभ झाला.

या उपक्रमासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय, स्काऊट-गाईड कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विविध शाळा-महाविद्यालये, महिला आर्थिक विकास महामंडळ यासह विविध संस्थांचा सहभाग होता. राज्य क्रीडा मार्गदर्शक नलिनी जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट्ट, स्काऊट गाईड जिल्हा संघटक किरण लहाने, जयमालाताई जाधव, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे राजेश गावंडे, मेरा युवा भारत केंद्राचे मदन भरगाटे यासह क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते.

# लिनेस क्लब कडून 'दामिनी पथका'च्या पोलिस निरीक्षक चंद्रकला मेहरे यांचा सन्मान

प्रतिनिधी ९ मार्च




**अकोला :** लिनेस क्लब ऑफ अकोला तर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून समाजाची सुरक्षा आणि सेवेसाठी समर्पित महिलांचा गौरव करण्यात आला. शहराच्या महिला आणि मुलींचे सुरक्षा कवच मानल्या जाणाऱ्या 'दामिनी पथका'च्या पोलीस निरीक्षक चंद्रकलाजी मेहरे आणि त्यांच्या पथकाचा सन्मान करण्यात आला.क्लबच्या अध्यक्ष राजश्री सामनपुरे (जसवाल) यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमात चंद्रकलाजी मेहरे यांना पुष्पगुच्छ, शाल आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या अनुकरणीय कार्याचे कौतुक करण्यात आले. तसेच, दामिनी पथकात त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून पेट्रोलिंग करणाऱ्या १० महिला पोलीस कर्मचाऱ्यांचेही पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मार्च महिन्याच्या या कडक उन्हात सर्वांसाठी ऊसाच्या रसाची व्यवस्था करून त्यांना थंडावा व दिलासा देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान हे विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले की, चंद्रकलाजी मेहरे आपली कर्तव्ये इतक्या चोखपणे पार पाडू शकतात कारण त्यांना त्यांच्या आईचे पूर्ण सहकार्य लाभते, ज्या त्यांच्या मुलांचा सांभाळ करतात. या कौटुंबिक पाठबळाचा आदर राखत, क्लबतर्फे 'आईपेक्षा मुलगी सवाई' या प्रोजेक्ट अंतर्गत त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# अकोल्यात तप्त ऊन, पण बसस्थानकातील पंखे बंद

प्रतिनिधी ९ मार्च

## ♦ प्रवाशांच्या सोयी सुविधांकडे आगार व्यवस्थापनाचे दुर्लक्ष



**अकोला :** शहरातील तापमान मार्च महिन्यातच उच्चांक गाठत आहे. मात नवीन बसस्थानकात प्रवाशांसाठी असलेले पंखे बंद आहेत. एकीकडे उन्हामुळे जीवाची लाहीलाही होत आहे पण आवश्यक सुविधा सुद्धा प्रवाशांना मिळत नाही. रविवारी बसस्थानक परिसरात प्रचंड गर्दी होती. यातील काही जणांनी पंखे बंद असल्याने संताप व्यक्त केला. बसस्थानकात उन्हाच्या झळा सोसत प्रवासी बसची वाट पाहतात. वृद्ध तसेच विविध वयोगटातील व्यक्ती त्यात असतात. अशावेळी पंखे सुरू असले तर तेवढाच गारवा मिळू शकतो. परंतु आगार व्यवस्थापनाला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. उन्हाळ्यात पंखे, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा असते मात्र याबाबत कमालीची उदासीनता दिसून येते.

# राजकमल चौक परिसरात भूमिगत गटार योजनेसाठी रस्ता खोदला

## ♦ नागरिकांना धूळ-मातीचा त्रास काम संथगतीने

प्रतिनिधी ९ मार्च


**अकोला:** येथील राजकमल चौक ते कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर भूमिगत गटार योजनेचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, काम संथ गतीने सुरू असल्याने आणि रस्ता खोदून ठेवल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात धूळ-मातीचा त्रास सहन करावा लागत आहे. भूमिगत योजनेसाठी रस्ता खोदण्यात आला आहे. मात्र रस्ता खोदून झाल्यानंतर तो तातडीने दुरुस्त करण्यात आलेला नाही. त्यामुळे परिसरात सर्वत्र धूळ आणि माती पसरलेली दिसत आहे.

वाहनचालक आणि पादचारी यांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते या रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे परिसरातील वाहतूक आणि दैनंदिन हालचालींवर परिणाम होत आहे. प्रशासनाने या कामाकडे लक्ष देऊन रस्त्याचे काम लवकर पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# वर्चस्वासाठी दोन नर हरणे एकमेकांशी भिडले

प्रतिनिधी ९ मार्च

## ♦ शिंगांनी एकमेकांवर केले जोरदार प्रहार



**अकोला :** शहराजवळ असलेल्या काटेपूर्णा अभयारण्यात दोन हरणांमध्ये जोरदार झुंज झाली. जंगलात अशा प्रकारच्या घटना क्वचितच पाहायला मिळतात. अभयारण्याला भेट देणाऱ्या पर्यटकांनी या दोन हरणांच्या लढतीचा थरार प्रत्यक्ष अनुभवला.

जिल्ह्यातील महान धरणाच्या सभोवताली काटेपूर्णा अभयारण्य आहे. अभयारण्यात वाघ, बिबट्या, नीलगाय, हरण, रानम्हशी, रानडुक्कर, काळवीट आणि अनेक वन्यजीवांचा रहिवास आहे. तसेच येथे माकडे, मोर आणि विविध प्रजातींच्या पक्ष्यांचा वावर असतो. सध्या काटेपूर्णा अभयारण्याला भेट देण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, त्यांच्यासाठी जंगल सफारीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. आज अभयारण्याला भेट देणाऱ्या पर्यटकांना दोन हरणांची वर्चस्वासाठी झालेली जोरदार धडक पाहायला मिळाली. हरीण तसे स्वभावतः शांत मानले जातात, परंतु दोन्ही नर आपल्या लांब आणि अणकुचीदार शिंगांनी एकमेकांवर जोरदार प्रहार करत होते. दोघेही हार मानण्यास तयार नव्हते. बऱ्याच वेळ ही झुंज सुरू राहिली आणि अखेर थकल्यामुळे एका हरणाने तिथून पळ काढला. ही लढत पाहणाऱ्या एका पर्यटकाने या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला आहे.

# टेरेसवर माती नसतानाही तयार करू शकतो गार्डन, अकरा वर्षीय विद्यार्थ्याचे संशोधन

प्रतिनिधी ९ मार्च



**अकोला :** हायड्रोपोनिक प्लांटेशन ही नवीन संशोधनावर आधारित संकल्पना आहे. वृक्षारोपण व शेतीसाठी उपयुक्त अशी पद्धती आहे. शेतकऱ्यांना अशा प्रकारची शेती केल्यास उपयुक्त असा फायदा होऊ शकतो. हायड्रोपोनिक प्लांटेशन म्हणजे मातीविना झाडांचे रोपण करून त्यांची चांगली वाढ होऊ शकते. जिथे मातीची कमतरता असेल तिथे हायड्रोपोनिक प्लांटेशन फार उपयोगी ठरते. अशा प्रकारचा उपक्रम वर्ग सहावी मध्ये शिकणारा शोभित प्रज्ञानंद थोरात याने घरगुती टाकाऊ वस्तु पासून उपयुक्त असे हायड्रोपोनिक प्लांटेशन तयार केले आहे.

यासाठी मातीविना झाडांचे रोपण करून त्यांची चांगली वाढ होऊन त्याला फळ फुल व धान्यांची वाढ होऊ शकते. आणि यासाठी पाणी सुद्धा फार कमी प्रमाणामध्ये लागते, वापरलेल्या पाण्याचा पुन्हा वापर होऊ शकतो, त्यामुळे ही एक सोपी, उपयुक्त व फायद्याची अशी प्रक्रिया आहे. घरातील बाल्कनी मध्ये टेरेसवर जिथे मातीची कमतरता असेल अशा ठिकाणी आपण हायड्रोपोनिक सुंदर गार्डन तयार करू शकतो.

त्यासाठी घरामधील टाकाऊ मोठा पाईप, त्याला छिद्र पाडून पाणी पिण्याचा प्लास्टिक ग्लासचा वापर करून त्यामध्ये झाडांचे रोपण करतात. या पाईप मधून पाण्याचा प्रवाह होण्यासाठी मोठ्या पाईपच्या दोन्ही साईडला कॅप लावून त्यामधून छोट्या पाईपच्या साह्याने पाणी आत मध्ये जाते आणि दुसऱ्या बाजूला तेच पाणी बाहेर येऊन पुन्हा त्याचा वापर करता येतो. त्यामुळे पाण्याचा अपव्य होत नाही. सदर पाईप ठेवण्यासाठी एक लोखंडी स्टॅन्ड घेऊन घरातील बालकनी किंवा टेरेसवर सुंदर असे गार्डन तयार होते. असा नवीन संशोधन पर वैज्ञानिक उपक्रम नोवेल कॉर्नमेंट



मधील वर्ग सहावी शिकत असलेला अकरा वर्षाचा विद्यार्थी शोभित प्रज्ञानंद थोरात याने तयार केला आहे.

# गांधी चौक झाला ऑटोरिक्षा स्टँड

## ♦ नागरिकांना चालणे झाले अवघड



प्रतिनिधी ९ मार्च

**अकोला :** शहरातील गांधी चौकात अस्थाई विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. तसेच ऑटोरिक्षा चालक रस्त्यावर वाहने उभी करतात. त्यामुळे वाहने तर सोडाच पायी चालणे देखील कठीण झाले आहे. वाहतूक शाखेने समस्या सोडवावी अशी मागणी केली जात आहे.

अस्थाई विक्रेत्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहाच्या मागील बाजूस व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु विक्रेते गांधी चौक, न्यू क्लारा मार्केट समोर गाड्या लावण्यात धन्यता मानतात. त्यामुळे नागरिकांची किती गैरसोय होते याकडे दुर्दैवाने लक्ष दिले जात नाही. शहरातील मुख्य चौक मोकळे होतील यासंदर्भात पावले उचलावी अशी मागणी केली जात आहे.

# जनता भाजी बाजारात पार्किंगची झाली कचरा कुंडी

## ♦ जनावरे फिरत असतात कमालीची दुर्गंधी

प्रतिनिधी ९ मार्च



**अकोला :** महापालिका यंत्रणा विशेष करून जनता भाजी बाजारातील साफसफाईकडे दुर्लक्ष करताना दिसते. त्यामुळे बाजारात आपण भाजी खरेदी करायला आलो की आजार विकत घ्यायला असा प्रश्न नागरिकांना पडतो. कचरा, सडका भाजीपाला पार्किंग साठी असलेल्या जागेत टाकला जातो.

जनता भाजी बाजार शहरातील मुख्य बाजार असल्याने शहरातील नागरिक मोठ्या संख्येने खरेदी साठी येतात. साचलेला कचरा, मोकाट जनावरे, दुर्गंधी यामुळे बाजारात पाय ठेवावा की नाही असा प्रश्न पडतो. या भागातील समस्या नवीन नाही. नागरिक संताप व्यक्त करतात परंतु महापालिका यंत्रणा याकडे लक्ष देत नाही. नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून बाजारात चांगले वातावरण राहणे आवश्यक आहे. याकडे दुर्लक्ष होऊ नये अशी शहरवासीयांची महापालिका प्रशासनाकडे अपेक्षा आहे. महापालिका यंत्रणा विशेष करून जनता भाजी बाजारातील साफसफाईकडे दुर्लक्ष करताना दिसते. त्यामुळे बाजारात आपण भाजी खरेदी करायला आलो की आजार विकत घ्यायला असा प्रश्न नागरिकांना पडतो. कचरा, सडका भाजीपाला पार्किंग साठी असलेल्या जागेत टाकला जातो.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK